| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ७१ वा | गुरूवार दिनांक २१ मे, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सचिन रा. भातागळी ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.१९.०५.२०२६ रोजी भातागळी येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ केसरयुक्त विमल पान मसाला तंम्बाकु पुडे असा एकुण १०,८०० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला लोहारा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-१२३, २२३, २७४, २७५ सह कलम ५९ अन्न सुरक्षा व मानके अधिनियम अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### केबल्स, कनेक्टर आदि वस्तूची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रज्ञा नारायण देशमुख, वय २४ वर्षे, रा. देवळाली ता. जि. धाराशिव यांचे वडीलांचे बेंबळी ते धाराशिव जाणारे रोडच्या दोन्हीबाजूस सत्कर्म ग्रीन एनर्जी प्रा. लि. या सौरउर्जा कंपनीचे प्लॅटमध्ये बरमगाव बु. शिवार येथुन १ डीसी केबल्स ४ स्के मिमि ४५०० मिटर, एमसी ४ कनेक्टर ११२ नग, ३ कन्डयुट पाईम ४००० मिटर एकुण ३,३२,९९२ किंमतीचा माल हा दि. ०७.०५.२०२६ रोजी ००.०० ते ०५.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रज्ञा देशमुख यांनी दि.१९.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे ये गुन्हा नोंदवला आहे.

### हिरो एचएफ डिलक्सची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-रमेश शिवाजी कांबळे, वय ३५ वर्षे, रा. संतोष माता चौक सुभाष नगर बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांची हिरो एचएफ डिलक्स काळ्या रंगाची एमएच १३ सीझेड ४८६४ ही दि.०३.०६.२०२५ रोजी अनिल तांबे रा. तांबेवाडी ता. भुम यांचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रमेश कांबळे यांनी दि.१९.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

परंडा पोलीस ठाणे:आरोपी नामे-सोमनाथ गणपत बोडके, वय ४३ वर्षे, रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१९.०५.२०२६ रोजी १२.१० वा. सु. आपल्या ताब्यातील पॅगो रिक्षा क्र एमएच २५ पी ४२६३ हा परंडा ते अनाळा सार्वजनिक रोडवर परंडा येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे.

## निवडणूक काळात परवानाधारक शस्त्रास्त्रे वाहून नेण्यास बंदी

## धाराशिव,लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये २५ जूनपर्यंत आदेश लागू

धाराशिव (जिमाका) विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी धाराशिव,लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये परवानाधारक शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये हा आदेश निर्गमित केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या विधान परिषदेची स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक -२०२६ (उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ) निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून,कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

निवडणूक प्रक्रिया शांततेत,निर्भय आणि न्याय वातावरणात पार पडावी,यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १३ मार्च १९९६ आदेशान्वये देण्यात आलेल्या निर्देशांच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणूक जाहीर झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.प्रत्येक शस्त्र परवाना धारकास स्वतंत्र नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची खात्री झाल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या आदेशानुसार शासकीय कर्तव्य बजावणारे अधिकारी-कर्मचारी, दंडाधिकारी अधिकार प्राप्त अधिकारी-कर्मचारी तसेच बँकांच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी -कर्मचारी यांना वगळता इतर सर्व परवानाधारकांना शस्त्रास्त्रे वाहून नेण्यास बंदी राहणार आहे. हा आदेश धाराशिव,लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून २५ जून २०२६ पर्यंत लागू राहणार असून,हा आदेश १८ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे.

## धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सचिन वय ३८ वर्षे, रा.मंगरुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.१९.०५.२०२६ रोजी ११.४५ वा. सु. मंगरुळ मुलतन गल्ली अंदाजे २,७०० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तसेच बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत वसंत वय ६५ वर्षे, रा.कोठाळवाडी ता. कळंब जि. धाराशिव ह.मु. खामसवाडी शिवार फॉरेस्ट हे दि.१९.०५.२०२६ रोजी ११.३० वा. सु. अनसुर्डा रुईभर खामसवाडी चौकातील जाणारे रोडलगत अंदाजे ८४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २१ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## वडजी शिवारातून ६२ लाखांचा गुटखा जप्त: एकाला अटक, इतर फरारांचा शोध सुरू

कळंब (प्रतिनिधी)- कळंब जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. येरमाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वडजी शिवारात डोंगररांगांमध्ये लपवून ठेवलेला तब्बल ६२ लाख ४८ हजार ६० रुपयांचा सुगंधी तंबाखू आणि गुटख्याचा साठा पोलिसांनी जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. त्यास न्यायालयासमोर हजर केले असता त्यास एक दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला गुप्त बातमीदारामार्फत वडजी शिवारातील एका तलावाजवळ लिंबाच्या झाडाखाली ताडपत्रीने झाकून मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करून पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार यांनी येरमाळा पोलिसांच्या मदतीने तात्काळ या ठिकाणी सापळा लावला.

पथक घटनास्थळी पोहोचताच तेथे बसलेल्या ७ ते ८ संशयितांनी पळ काढला. मात्र, पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला. यामध्ये छगन बिसराम शिंदे (रा. लक्ष्मी पारधी पिढी, तेरखेडा) याला पकडण्यात यश आले. पोलिसांनी ताडपत्री उघडून पाहिली असता त्यात राजनिवास गुटखा आणि सुगंधी तंबाखूची पोती आढळून आली. मुद्देमालासह तीन मोटारसायकली असा एकूण ६२ लाखांचा ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे.

धाडसी कारवाई वडजी शिवार हा भाग दुर्गम आणि डोंगराळ असल्याने आरोपींना पळून जाणे सोपे होते. मात्र, भर उन्हात पोलिसांनी टेकड्यांवरून पाठलाग करत एका आरोपीला बेड्या ठोकल्या. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा आणि येरमाळा पोलिसांनी संयुक्तपणे राबवली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य रस्त्यावरील कारवाई टाळण्यासाठी आता तस्कर डोंगराळ भाग आणि तलावाकाठच्या झाडाझुडपांचा वापर साठवणुकीसाठी करत आहेत. तेरखेडा आणि मस्सा येथील काही जण या रॅकेटमध्ये सक्रिय असल्याची माहिती समोर आली आहे. लवकरच मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे.

## १५०० बुकिंगनंतर मिळतात फक्त ४०० सिलिंडर, ११०० जण गॅस'वर: बुकिंग करूनही मिळेना गॅस?

धाराशिव (प्रतिनिधी)- गॅस सिलिंडरच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. प्रशासनाने मुबलक साठ्याचे केलेले दावे प्रत्यक्षात सपशेल फोल ठरले आहेत. एका बाजूला गॅस एजन्सीमध्ये १५०० ग्राहकांनी बुकिंग केल्यानंतर केवळ ४०० सिलिंडरचा पुरवठा होत आहे. ११०० जणांचा हिरमोड होतोय. त्यातच शासनाच्या नव्या नियमानुसार एकदा सिलिंडर घेतल्यानंतर पुढील बुकिंगसाठी तब्बल ४५ दिवसांची अट घालण्यात आली आहे. बुकिंग केल्यानंतरही प्रत्यक्ष सिलिंडर हातात पडायला ५० दिवसांचा कालावधी लागत आहे. त्यामुळे या मधल्या काळात स्वयंपाक करायचा कसा? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

चुलीच्या धुरापासून महिलांची मुक्तता करण्यासाठी शासनाने उज्ज्वला योजनेंतर्गत गावागावात गॅस कनेक्शन दिले. ग्रामीण भागात एका कुटुंबात बहुतांश एकच कनेक्शन आहे. मात्र, आता याच कनेक्शनला वेळेवर सिलिंडर मिळत नसल्याने योजनेचा मूळ उद्देशच हरवला आहे. गॅसअभावी ग्रामीण भागातील महिलांना पुन्हा एकदा रानावनात भटकंती करून सरपण गोळा करावे लागत असून, घरोघरी पुन्हा चुली पेटल्या आहेत. दुसरीकडे, गॅस एजन्सीवर ई-केवायसी आणि मोबाइल नंबर बदलण्यासाठी ग्राहकांची मोठी गर्दी उसळत आहे. गॅस कंपन्या आणि प्रशासन पुरवठा सुरळीत असल्याचे सांगत आहेत. मात्र परिस्थिती भीषण आहे. वेळेवर गॅस मिळत नसल्याने नागरिक वैतागले आहेत. उज्ज्वला योजनेचे यश केवळ वाटप केलेल्या गॅस कनेक्शनच्या आकड्यांवर मोजले जात आहे. मात्र, कनेक्शन दिल्यानंतर त्यांना शाश्वत, वेळेवर आणि परवडणारा गॅस पुरवठा देण्यास व्यवस्था अपयशी ठरली आहे. परिणामी, आरोग्य आणि पर्यावरण रक्षणाचा या योजनेचा मूळ उद्देशच भरकटला आहे. जर गॅस कंपन्या आणि प्रशासन मुबलक साठा असल्याचा दावा करत असतील, तर १५०० बुकिंगच्या तुलनेत केवळ ४०० सिलिंडरच कसे येतात? हा पुरवठ्यातील दोष आहे की निर्माण केलेला 'कृत्रिम तुटवडा'? व्यावसायिक गॅसचा पुरवठा बंद असल्याने घरगुती गॅसचा काळ्या बाजारात व्यावसायिक वापर तर वाढला नाही ना? याची चौकशी प्रशासनाने करणे गरजेचे आहे.

चुलीचा धूर वाचवण्यासाठी उज्ज्वला योजनेतून गॅस शेगडी मिळाली खरी, मात्र सिलिंडरचा वेळेवर पुरवठा होत नसल्याने ही योजना आता कुचकामी ठरत आहे. ५० दिवस गॅस मिळत नसल्याने गृहिणींना नाइलाजाने पुन्हा चुलीवरच स्वयंपाक करावा लागत आहे. धुराचा त्रास कमी होण्याऐवजी सरपणासाठी वणवण फिरण्याची वेळ ग्रामीण भागातील महिलांवर आल्याने योजनेचा बोजवारा उडाला आहे.

४५ दिवसानंतर बुकिंग ५० दिवसाला गॅस सिलिंडर हा शासनाचा नियम आहे. बुकिंगची वाढल्यानंतर त्या तुलनेत गॅस सिलिंडरचा पुरवठा होणे आवश्यक आहे. शासनाच्या नियमाने नागरिकांची गैरसोय होऊ लागली आहे. पहिले सिलिडर घेतल्यानंतर ५० दिवसांचा कालावधी अधिक आहे. मात्र ओटीपी आलेल्या ग्राहकांना सिलिंडर मिळणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सूचना करण्यात येतील.
- स्वाती शेंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, धाराशिव.

घरगुती ग्राहकांसोबतच हॉटेल आणि इतर व्यावसायिकांनाही गॅस टंचाईचा मोठा फटका बसला आहे. व्यावसायिक गॅसचा पुरवठा जवळपास बंद करण्यात आल्याने अनेक छोटे-मोठे व्यवसाय ठप्प झाले आहेत. हॉटेल्स बंद ठेवण्याची नामुष्की ओढावल्याने या क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या तरुणांवर महागाईत बेरोजगारीची व उपासमारीची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

केवळ घरगुतीच नव्हे तर हॉटेल आणि छोट्या व्यवसायांनाही गॅस न मिळणे हे स्थानिक अर्थचक्राला मारक आहे. कोरोनानंतर कशीबशी सावरलेली ही छोटी व्यावसायिक व्यवस्था गॅस टंचाईमुळे पुन्हा कोलमडत असून, यातून बेरोजगारीचा नवा प्रश्न निर्माण होत आहे.




## गावठी कट्ट्यासह एकजन स्थानिक गुन्हे शाखेने केला गजाआड

धाराशिव (शेख अंजुम)- दि.१८.०५.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यातील मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणे, पाहिजे फरारीचा शोध तसेच अवैध शस्त्र बाळगणारे इसमांची माहिती काढून कारवाई करीता सपोनि अमोल मोरे, पोह/राहुल नाईकवाडी, शिंदे, अमोल चव्हाण, मपोह/ शोभा बांगर, चालक पोकॉ दहीहांडे असे रवाना होवून पेट्रोलिंग करत कन्हेरवाडी गावाजवळ आले असता पथकास माहिती मिळाली की, प्रशांत उर्फे भमड्या रा. कन्हेरवाडी, ता. कळंब, अशोक रा. बावी ता. वाशी हे दोघे मोटरसायकलवर कन्हेरवाडी पाटी येथे येणार असुन त्यांचे ताब्यात अग्नीशस्त्र असलेबाबत ख बातमी मिळाल्याने पथकाने नमुद ठिकाणी जावून कन्हेरवाडी पाटी येथे थांबलो असता दोन इसम विना नंबर प्लेटच्या मोटरसायकलवर येताना दिसले. त्यास पथकाने थांबवले असता त्यातील एक इसम गावठी शस्त्र टाकुन पळुन गेला असता दुसऱ्यास इसमास पथकाने ताब्यात घेवून त्याचे नाव गाव विचारले असता त्यानी त्याचे नाव अशोक नाना पवार, रा. बावी शिवार काटशिवरी पारधी पिढी ता. वाशी ह.मु. कन्हेरवाडी ता. कळंब असे सागिंतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला एक गावठी कट्टा मिळून आला. तो ताब्यात घेवून पळून गेलेल्या इसमा बाबत विचारले असता विशाल उर्फे प्रकाश उर्फे भामडया बालाजी काळे असे सागिंतले. इसम अशोक नाना काळे याचे कडील मोटरसायकल बाबत चौकशी केली असता त्याने सदर मोटरसायकल ही मुरुड ता. जि. लातुर येथुन चोरी करुन आणले बाबत सांगितले. त्याबाबत पोलीस ठाणे मुरुड येथे खात्री केली असता सदर मोटरसायकल चोरीचा मुरुड पोलीस ठाणे गुरनं ०४/२०२५ कलम ३०३ प्रामाणे गुन्हा दाखल असल्याचे समजले. त्यानंतर दोन्ही गावठी कट्टे व मोटरसायकल पथकाने ताब्यात घेतली.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद ईज्जपवार, सपोनि अमोल मोरे, पोह/राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे, अमोल चव्हाण, मपोह/ शोभा बांगर, चालक पोकॉ दहीहांडे यांचे पथकाने केली आहे.

## गुंठेवारीची प्रक्रिया त्वरीत सुरु करा - रामदास कोळगे

धाराशिव (प्रतिनिधी)जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील जमीन, प्लॉट, घर जागा यांची गुंठेवारी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने मुदतवाढ न दिल्यामुळे सध्या नागरीकांचे मोठे नुकसान होत आहे त्यामुळे सदरील गुंठेवारीची प्रक्रिया त्वरीत सुरु करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेश सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत गुंठेवारीची प्रक्रिया सुरु होती २०२६ पासुन गुंठेवारी प्रक्रियेस जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मुदत वाढ देण्यात आली नाही त्यामुळे जागेची गुंठेवारी नसल्यामुळे घरांचे बांधकाम करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँक ग्रामीण भागातील नागरिकांना घर बांधकामासाठी कर्ज देत नाहीत तसेच शहरी व ग्रामीण भागातील प्लॉटचे एकत्रीकरण, ऑनलाईन बांधकाम परवाने रखडले असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांनी त्वरीत गुंठेवारीस मुदत वाढ देऊन गुंठेवारीची प्रक्रिया सुरु करावी अशी मागणी श्री. कोळगे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## मोटरसायकलला धडक:एकाचा मृत्यू तर दुसरा जखमी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जखमी दिगंबर मारुती खंदारे, रा. किसान चौक मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव व सोबत मयत नामे- वसंत उध्दव राठोड, वय ४५ वर्षे, रा. आचार्य तांडा मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव हे दोघे दि.१८.०५.२०२६ रोजी मोटरसायकल क्र एमएच २५एबी ६९०१ वरुन जात होते. दरम्यान हंगरगा शिवार येथील तुळजाभवानी सुतमिल शेजारील मुकबधीर शाळेसमोर नळदुर्ग ते तुळजापूर जाणारे रोडवर टाटा कंपनीची मालवाहतुक गाडी क्र एमएच २५ एजे ४११२ चा चालकाने त्याचे ताब्यातील टाटा कंपनीची मालवाहतुक गाडी ही हायगईने व निष्काळजीपणे चालवून अचानकपणे उजवे बाजूचे इंडीकेटर न देता उजवे बाजूस वाहन घेतल्यामुळे दिगंबर खंदारे व वसंत राठोड यांचे मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात वसंत राठोड हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर दिगंबर खंदारे हे गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विजया वसंत राठोड, वय २८ आचार्य तांडा मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१९.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## देशभक्तचे संपादक लक्ष्मण शिंदे - पाटील यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार जाहीर



धाराशिव (प्रतिनिधी) - ज्ञानदिप सामाजिक विकास संस्थेच्यावतीने दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार - २०२६ पुरस्कार दैनिक देशभक्तचे संपादक लक्ष्मण शिंदे-पाटील यांना जाहीर झाला आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले, सचिव मिलींद कळवणकर, उपाध्यक्ष एम.डी. प्रताप, खजिनदार अनिल कळंके यांनी एका पत्राद्वारे जाहिर हा पुरस्कार जाहीर केला आहे. या पुरस्काराचे वितरण डॉ. बाबासाहे आंबेडकरांचे नातू आणि इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते व रिपब्लिकन सेना युवा नेते ड.अमन आंबेडकर, नाशिकचे पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, समाज कल्याण विभागाचे उपआयुक्त भगवान वीर, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, रिपब्लिकन सेना महाराष्ट्र राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे, नाशिक महानगरपालिकेचे सहाय्यक उपायुक्त नानासाहेब साळवे, संपादक सुधीर उमराळकर, दिनेश जाधव, भीमकन्या रिअल स्टार असावरी बर्वे यांच्या उपस्थितीत शनिवार दि.२३ मे रोजी करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम नाशिक येथील वावरे नगरमधील पौर्णिमा स्वीट जवळील समुद्र लॉन्स कामटवाडे येथे आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल शिंदे-पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## उष्णतेचे संकट, मात्र उपयोजनाच नाही

राज्यात काय देशात उष्णतेची लाट आली असून जनता त्रासून गेली आहे. सर्वात वाईट ऋतू हा उन्हाळा आहे. यात संरक्षण करायाचे कठिण आहे. हिवाळ्यात पांघरून घेता येते, पावसाळ्यात रेणकोट किंवा छत्री वापरता येतात. उन्हाळ्यात काही करता येत नाही. आजोबा-पंजोबांनी लावलेली मोठी झाडे तोडून विकून खाल्ली! राणात गेले तर सावलीसाठी झाड शोधावे लागते. पाण्याची पातळी खोलवर गेली आहे. कोसोदुर हून पिण्याचे पाणी मागवावे लागते. उष्णतेचा तडका सहन होत नसल्याने काहीजणास जीव गमवावा लागला आहे. यावर्षी उन्हाळा अधिक आहे तो जाणवत आहे. पावुस कधी पडेल याची वाट चातका प्रमाणे सर्वजन पाहात आहेत. त्यामुळे यावर्षीचा उन्हाळा कडक आहे हे मान्यच केले पाहिजे. उन्हाळ्याची झळ सोसवत नाही. तरी पर्याय नाही म्हणून गप्प आहेत. वास्तविक उन्हाचे किंवा उष्णतेचे प्रमाण का वाढते व पाणी पातळी कमी झाली, पावसाळा का घटला, ओझानचा थर का पातळ होत चालला. सुर्य किरणे थेट पृथ्वीवर पडत आहेत. यामुळे त्वचा रोगात वाढ झाली आहे. या बाबत चिंतन केले जात नाही. या समस्यावर जबाबदार हा मानव आहे. याचा त्रास मुक्या प्राण्यांना सहन करावा लागत आहे. जंगलातील प्राण्यास खायला अन्न नाही. फळे नाहीत. सर्वात मोठे दुर्दैव म्हणजे पिण्यासाठी पाणी नाही. त्यामुळे हिंस्त्र पाणी गाववस्त्याकडे वळत आहेत. हल्ले करीत आहेत. पुर्वी असे नव्हते. पावसाळा अधिक प्रमाणात होता. धाराशिव जवळील यडसीच्या डोंगरात रामलिंग मंदिराच्या परिसरात कोठे खड्डा करा पाणी उपलब्ध होत असत. ते पाणी जनावरांना व पिण्यासाठी वापरत असत. आता काय स्थिती आहे. सर्वाधिक फॉरेस्ट एडसी, रामलिंग परिसर, येडाई आदि भागात होते. धाराशिव जिल्हा तसा निसर्गरम्य भाग होता व काही प्रमाणात आहे. एक पर्यटन स्थळ आहे याकडे लोकप्रतिनिधीचे लक्ष नाही त्यापेक्षा कार्यकर्ते, जनतेचे लक्ष नाही. जम्मूकाश्मीर काय घेवून बसलात आपल्या धाराशिव जिल्ह्यात काय कमी आहे. याचा विचार करा? केवळ विचार करा. आजही पावसाळा पुर्व हवाईमार्गे जर जंगली झाडाच्या बियाची फवारणी केली तरी पावसाळ्यात झाडे उगवतील. याला पाणी घालण्याची गरज नाही किंवा जोपासण्याची गरज नाही. हे केले पाहिजे. प्रत्यक्षात डोंगराळ भागात जावून झाडे लावु शकत नाही. त्यामुळे हवाईमार्ग पेरणी शक्य आहे. असो उन्हाळा का वाढता आहे. यामागील कारणे कोणती आहेत याची कल्पना सर्वांना आहे. एक तर कॉंक्रेटची जंगले वाढली आहेत. त्याच प्रमाणे सर्वात मोठी चुक माणुस करीत आहे. याला जबाबदार सर्वच आहेत. शासन, प्रशासन, नागरिक, कार्यकर्ते, सामाजिक संस्था आदि जबाबदार आहेत, ते प्रामाणिक वृक्षारोपन करीत नाहीत. देखावा अधिक असतो. त्याच प्रमाणे ऐंशी टक्केझाड लावल्यावर दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी दिसून येत नाही. ही एक शोकांतिका व वस्तूस्थिती आहे. देखावा कमी करा व प्रत्यक्षात कामे करा. अनेक वर्षापासून वृक्षारोपन केले जाते पाच वर्षात किमान मोठ्या प्रमाणात झाडे दिसली असती. पाच वर्षातील लावलेली झाडे कोठे गेली? याचा शासनाकडून आढावा घेतला पाहिजे. नसता हा देखावा बंद तरी केला पाहिजे. आहे ती रोपे कशाला वाया घालता? मुळात वृक्षारोपन प्रामाणिक होत नाही. हे उघड आहे. किमान सामाजिक कामात तरी प्रामाणिकपना असला पाहिजे. याचा परिणाम हा उष्णता वाढीवर होत आहे. नदी, बंधारे मधील पाण्यातील ऑक्सीजनचे प्रमाण कमी होत आहे. दुपारच्यावेळी श्वास घेण्यात आडचण येत आहे. अशा स्थितीत अजूनही नागरिकांचे डोळे उघडले नाहीत. पावुस कमी प्रमाण होण्याचे कारण वातावरणातील दुषीतपना, वृक्ष तोड आदि आहे. मुळात राज्यातील वनअधिकारी म्हणजे फॉरेस्ट कार्यालय बंद करावे. जंगले नाहीत तर कार्यालय कशाला हवे आहेत. मोठ्या प्रमाणात आरी गिरण्या चालू आहेत. वृक्षतोड होते तर काही कार्यालये बंद करावित, असून ही फायदा नसेल तर नुसती देखावा कशासाठी? या बाबीचा विचार केला पाहिजे. उन्हाच्या तडाक्यामुळे माणसा बरोबर जनावरे मरत आहेत. याची तरी दयामाया येवू द्या. केवळ स्वार्थासाठी जर काम करणार असेल तर ते योग्य नाही. आज उन्हामुळे अंगाची लाही-लाही होत आहे. अबालवृद्धांचे जगणे असाह्य होत आहे. आता पावसाळा लवकर सुरू होणार आहे. केवळ वृक्षारोपन करून चालणार नाही तर ती जगविली पाहिजेत. जो पर्यंत मोठ्या प्रमाणात वृक्षारोपन होणार नाही. सर्वत्र हिरवाई दिसून येणार नाही तो पर्यंत उष्णता कमी होणार नाही. उष्णतेवर एकच उपाय वृक्षारोपन, आहे ती झाडे तोडू न देणे, झाडे लावताना विचार करून योग्य ठिकाणी लावली पाहिजेत. वर वीजेच्या तारा व खाली वृक्षारोपन केले गेले आहेत. झाड वाढले की कापा, दरवर्षी महावितरण तारेला झाडे किंवा फांद्या लागतात म्हणून किती तोड करते याचा विचार केला. त्यामुळे चुकीच्यापद्धतीने वृक्षारोपन केले जावू नये. पावसाळापुर्व झाडाची नोंद घ्यावी, नंतर लावलेली किती याची नोंद ठेवावी. याचे ऑडीट होणे गरजचे आहे. नसता काय होते 'आंधळं दळत रहाते व कुत्र पिढ खाते' अशा म्हणी प्रमाणे बाब होवू नये. त्यामुळे ऑडीट होणे अतिषय गरजेचे आहे. ज्यांना झाडे लावायाची आहेत त्यांनी जिल्हाधिकारी/ग्रामपंचायत,न.प.,महानगर पालिका यांच्याकडे नोंद करावी व दुसऱ्यावर्षी किती जगविली का नष्ट झाली याचा तपशील द्यावा. सध्याला कोणीही उठते झाड लावते, लागलीच वृत्तपत्रातून फोटे छापून आणले जाते. झाले काम? असे होता कामा नये. सामाजिक उपक्रम हे प्रामाणिक राबविली आहे. आज जी उष्णतेची समस्या मोठी आहे. जागतिक पातळीवर ही समस्या आहे. यावर मार्ग पाण्याची बचत बरोबर त्याचेही ऑडीट झाले पाहीजे. वृक्षारोपन प्रामाणिक झाले पाहिजे. त्यामुळे वाढत चालेली उष्णतेस आळा बसेल, उष्णतेचे प्रमाण कमी होईल. नसता एक ना एक दिवस दिवस उन्हामुळे आगी लागतील. आगीत जंगले नष्ट होतील. उष्णता ही घातक आहे. पावसाळा व हिवाळा हे ऋतू चांगले आहेत मात्र उन्हाळा हा काळजी घेणार ऋतू आहे हे सतत लक्षात घेवून उपयोजना करणे आपल्या हाती आहे ती केली पाहिजे.

# चला ! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेव या !

ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी-महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. 'जितकी बचत, तितकी राष्ट्रसेवा' हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबाजवणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे.

बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

कारण संकटे येत राहतात पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे. तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवूया ! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया !

**-प्रवीण टाके**
**उपसंचालक, (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर. मो. ९७०२८५८७७७**

# 'समृद्ध महाराष्ट्र'साठी शिक्षण, कौशल्यविकास आणि सीएसआर उपक्रमांची सांगड आवश्यक

### ग्रामीण भागापर्यंत डिजिटल शिक्षण आणि रोजगाराच्या संधी पोहोचविण्यावर भर




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये शाश्वत रोजगारनिर्मिती आणि कौशल्याधारित विकासाला गती देण्यावर भर देण्यात आला आहे. उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य, भविष्योन्मुख कौशल्य प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण, महिला व युवक सक्षमीकरण, ग्रामीण भागातील विकास आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शिक्षण प्रणाली यांसारख्या विषयांवर या चर्चेत सखोल मंथन झाले. मुंबई, पुणे आणि नाशिकपुरता विकास मर्यादित न राहता गडचिरोली, भामरागड यांसारख्या दुर्गम भागांपर्यंत विकास पोहोचला पाहिजे, यावर 'टेक महाइम्पॅक्ट २०२६' परिषदेत सर्व वक्त्यांनी मत व्यक्त केले.

समृद्ध महाराष्ट्र : सीएसआरच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगारक्षमता वृद्धी या विषयावरील चर्चासत्रात इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे, आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष बी. केदारे, शिव नाडर फाउंडेशनचे रॉबिन सरकार, ईवाय इंडिया चे हरीश पोरवाल तसेच सिस्को इंडियाचे नितीन भाटिया सहभागी झाले होते. या पॅनल चर्चेचे सूत्रसंचालन महाआयटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान पाटील यांनी केले.

सचिव अप्पासाहेब धुळज यांनी डिजिटल गव्हर्नन्स प्लॅटफॉर्ममुळे योजनांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सेवा वितरणात सुधारणा झाल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील जवळपास ७ कोटी ओबीसी नागरिकांसाठी विभाग कार्यरत असून विशेषतः भटक्या आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत योजना पोहोचविण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. मोबाईल प, चॅटबॉट प्रणाली आणि एकात्मिक शिष्यवृत्ती पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांना योजनांचा लाभ सहज उपलब्ध होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाज्योती आणि अमृत संस्थांमार्फत हजारो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, रोजगार आणि उद्योजकतेसाठी मदत दिली जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंडस्ट्री ४.० चे वाढते महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, उत्पादन, लॉजिस्टिक्स, अभियांत्रिकी आणि प्रशासन या क्षेत्रांमध्ये एआय प्रभावी साधन ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ एआयचा वापर शिकून चालणार नाही, तर त्याच्या मर्यादाही समजून घेतल्या पाहिजेत, असे ते म्हणाले. महाराष्ट्र शासनासोबत एआय आधारित संशोधन आणि उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांवर काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सिस्को इंडियाचे नितीन भाटिया यांनी युवकांमध्ये डिजिटल कौशल्यविकास आणि रोजगारक्षमता वाढविण्यासाठी कंपनीच्या उपक्रमांची माहिती दिली. महाराष्ट्र शासन आणि विविध संस्थांच्या सहकार्याने सुमारे एक लाख विद्यार्थ्यांना एआय नेटवर्किंग आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

शिव नाडर फाउंडेशनचे रॉबिन सरकार यांनी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांमध्ये एआय आधारित शिक्षण प्रणालीमुळे मोठा बदल घडू शकतो, असे सांगितले. उत्तर प्रदेशमध्ये एआय समर्थित उपक्रमांच्या माध्यमातून सुमारे तीन लाख महिलांना साक्षर करण्यात यश मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांनी मागील २५ वर्षांत डिजिटल साक्षरता आणि रोजगारक्षमतेसाठी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. एमएस-सीआयटीसह ३०० हून अधिक कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण, आदिवासी आणि लहान शहरांमधील ५ हजारांहून अधिक केंद्रांद्वारे विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. क्रांती या एआय आधारित चॅटबॉटची माहिती देताना त्यांनी सांगितले की, तो प्रादेशिक भाषांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधून डिजिटल शिक्षण आणि मार्गदर्शनासाठी मदत करतो.

ईवाय इंडियाचे हरीश पोरवाल यांनी उद्योग, शिक्षणसंस्था, शासन आणि सीएसआर संस्थांमधील सहकार्यामुळेच रोजगारक्षमता आणि रोजगाराच्या संधींमधील दरी कमी होऊ शकते, असे सांगितले. अभ्यासक्रम रचना, इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप आणि कौशल्याधारित प्रशिक्षणामध्ये सीएसआरची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. आदिवासी भाग, आकांक्षीत जिल्हे, महिला आणि वंचित घटकांवर विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

या चर्चेतून तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल शिक्षण आणि सीएसआर उपक्रम हे समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रभावी साधन ठरू शकतो. राज्याच्या प्रत्येक भागापर्यंत कौशल्य, डिजिटल सुविधा आणि रोजगाराच्या संधी पोहोचविणे हेच भविष्यातील महाराष्ट्राच्या विकासाचे प्रमुख ध्येय असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले.

# पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर महापारेषण सतर्क

### राज्य शासनाच्या उपाययोजना कंपनीत लागू करण्याचे निर्देश




**मुंबई/प्रतिनिधी :** पश्चिम आशियामध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सुचविलेल्या विविध प्रतिबंधात्मक व आपत्कालीन उपाययोजना महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) तातडीने लागू करण्यास सुरुवात केली आहे. याबाबत अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली महापारेषणने परिपत्रक जारी करून सर्व परिमंडळ, मंडळ, विभाग व उपविभाग कार्यालयांना आवश्यक निर्देश दिले आहेत.

विद्युत पारेषण व्यवस्था अखंडित व सुरळीत ठेवण्यासाठी यंत्रणेला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा आणि समन्वय यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

महापारेषणकडून सर्व क्षेत्रीय कार्यालयांना नियमित आढावा घेण्यास सांगण्यात आले आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने वरिष्ठांना माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार महापारेषणने सज्जता वाढवून वीज व्यवस्थेची सुरक्षितता आणि सातत्य कायम ठेवण्यावर भर दिला आहे.

दैनंदिन वापराकरिता इलेक्ट्रिक वाहने वापरण्यास प्राधान्य दिले आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्यस्थितीत कार्यालयीन कामकाजाकरिता दौरे आवश्यक असल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शक्यतो मेट्रो, लोकल आणि सार्वजनिक बसने प्रवास करावा. बैठका, प्रशिक्षण, सेमिनार आयोजित करणे आवश्यक असल्यास दूरदृश्य प्रणालीचा वापर करावा. तसेच कार्यालयीन कामाकरिता नैसर्गिक प्रकाशाचा वापर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

उपहारगृह तसेच विश्रामगृहातील उपहारगृहामध्ये खाद्यतेलाचा वापर कमी करून मोहरी व शेंगदाणे तेलाचा वापर करण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. परिपत्रकातील सूचनांचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

भोजशाळेच्या भिंतींमध्ये दडलेला इतिहास! मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने धार येथील भोजशाळेच्या वादावर ऐतिहासिक निर्णय दिला. भोज शाळेचा परिसर म्हणजे देवी वाग्देवी (सरस्वती) चे मंदिर आणि संस्कृत शिकण्याचे प्राचीन केंद्र होते, असे न्यायालयाने स्पष्ट करत तेथे पूजा करण्याचा हिंदू समाजाचा हक्कही मान्य केला आहे. भारतीय पुरातत्व विभागाच्या वैज्ञानिक अहवालावर विश्वास ठेवत न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. ही भोजशाळा नेमकी काय आहे, ती कोणी बांधली, तिथे काय घडले आणि हा वाद कसा सुरू झाला? याविषयी जाणून घेऊ...

**भोजशाळा काय आहे?**

मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात ही भोजशाळा असून, देशातील सर्वांत प्रसिद्ध आणि धार्मिक स्थळांपैकी ती एक मानली जाते. हिंदू समुदाय याला देवी सरस्वतीचे मंदिर आणि एक प्राचीन संस्कृत विद्यापीठ मानतो, तर मुस्लिम धर्मीय याला कमल मौला मशीद म्हणतात. काही जैन लोक देखील याला एक प्राचीन गुरुकुल असल्याचा दावा करतात. यामुळेच हे ठिकाण अनेक दशकांपासून धार्मिक, ऐतिहासिक आणि कायदेशीर वादाचे केंद्र बनले आहे.

**राजा भोज कोण होते?**

भोजशाळेचा इतिहास परमार घराण्याचे शासक राजा भोज यांच्याशी जोडलेला आहे. राजा भोज यांचा राज्यकाळ अंदाजे इ.स. १००० ते इ.स. १०५५ पर्यंत होता असे मानले जाते. ते माळवा प्रदेशातील सर्वांत विद्वान आणि शक्तिशाली राजांपैकी एक मानले जातात. इतिहासकारांच्या मते, राजा भोज यांनी आपली राजधानी उज्जैनहून धार येथे हलवून ते शिक्षण, कला आणि संस्कृतीचे एक प्रमुख केंद्र म्हणून स्थापित केले. त्याला केवळ एक योद्धा राजाच नव्हे, तर एक महान विद्वान आणि शिक्षणप्रेमी म्हणूनही ओळखले जाते.



# काळाच्या ओघात हरवलेले वैभव

**भोजशाळा नाव कसे पडले?**

भोजशाळा हा शब्द भोज आणि शाळा अशा दोन शब्दांपासून बनला आहे. राजा भोज यांनी सुरू केलेली शाळा ही साधीसुधी शाळा नव्हती, तर त्या काळातील हे एक मोठे संस्कृत विद्यापीठ मानले जात होते. तिथे देश-विदेशातून विद्यार्थी शिकायला येत असत. अनेक इतिहासकार याची तुलना नालंदा आणि तक्षशिला सारख्या प्राचीन शिक्षण केंद्रांशी करतात.

**शाळेत काय शिकवले जात होते?**

इतिहासकार आणि भारतीय पुरातत्व विभागाच्या नोंदींनुसार, भोजशाळेत संस्कृत, व्याकरण, तत्त्वज्ञान, साहित्य, नाट्यशास्त्र आणि वेद शिकवले जात होते. आजही येथील भिंतींवर आणि दगडांवर संस्कृत आणि प्राकृतमधील शिलालेख आढळतात. यामध्ये व्याकरणाची सूत्रे, काळ, देव-देवतांच्या प्रतिमा आणि अभिजात ग्रंथांचा समावेश आहे. यामुळेच अनेक तज्ज्ञ याला एक मोठे शैक्षणिक संकुल मानतात.

**ब्रिटिश दस्तऐवजांमध्ये काय लिहिले आहे?**

ब्रिटिश लेखक कर्नल जॉन माल्कम यांनी त्यांच्या 'हिस्ट्री ऑफ माळवा' या पुस्तकात भोजशाळेचा उल्लेख केला आहे. त्यांनी माळवा प्रदेशातील हिंदू शिक्षण आणि संस्कृतीच्या केंद्रांबद्दल विस्तृतपणे लिहिले आहे. भोपाळ पुरातत्व विभागाच्या अहवालात असेही म्हटले आहे की, सध्याच्या वास्तूत सरस्वती मंदिर आणि संस्कृत अभ्यास केंद्राचे असंख्य पुरावे आहेत.

**देवी वाग्देवी किंवा सरस्वतीशी काय संबंध?**

हिंदू धर्मीयांचा दावा आहे की, भोजशाळेत देवी वाग्देवी किंवा सरस्वतीची मूर्ती स्थापित करण्यात आली होती. असे म्हटले जाते की, येथे वसंत पंचमीच्या दिवशी देवी सरस्वतीची प्रतिष्ठापना झाली आणि शतकानुशतके येथे पूजा सुरू होती. नंतर, उत्खननादरम्यान देवी वाग्देवीची एक मूर्ती देखील सापडली, जी ब्रिटिशांनी १८८० मध्ये लंडनला नेली. ही मूर्ती अजूनही परदेशात अस्तित्वात असल्याचे म्हटले जाते.

**हा वाद कसा सुरू झाला?**

इतिहासकारांच्या मते, १३-१४ व्या शतकात अलाउद्दीन खिलजीच्या आक्रमणानंतर भोजशाळा संकुलात बदल झाला. हिंदू धर्मीयांचा आरोप आहे की, मूळ मंदिर आणि विद्यापीठ पाडून त्या जागी मशिदीसारखी रचना बांधण्यात आली. नंतर, परिसराजवळ सुफी संत कमाल मौला यांचे मंदिर बांधण्यात आले आणि मुस्लिम समाजाने तेथे नमाज पठण करण्यास सुरुवात केली. दुसरीकडे, मुस्लिम धर्मीयांचा दावा आहे की, ही जागा फार पूर्वीपासून कमाल मौला मशीद म्हणून वापरली जात आहे.

**स्वातंत्र्यानंतर काय झाले?**

१९५२ मध्ये भोजशाळा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीत आणण्यात आली. हळूहळू हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांचे दावे अधिक प्रबळ झाले आणि वाद वाढत गेला. हा मुद्दा १९९० च्या दशकात समोर आला. प्रशासनाने हिंदूंसाठी येथे मंगळवारी पूजा करण्याची व्यवस्था केली. तर शुक्रवारी मुस्लिम धर्मीयांना नमाज पठणाची संधी देण्यात आली होती. वसंत पंचमीच्या दिवशी हिंदूंना दिवसभर पूजा करण्याची परवानगी देण्यात आली होती.


**पुरातत्व पाहणीत काय आढळले?**

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, भारतीय पुरातत्व पाहणी विभागाने भोजशाळेची शास्त्रीय पाहणी केली. त्यावेळी ९४ मूर्ती आणि अवशेष आढळले. गणेश, ब्रह्मा, नरसिंह आणि भैरव यांच्या मूर्ती सापडल्या. संस्कृत आणि प्राकृत भाषांमधील शिलालेख आढळले. काही मूर्तींना हेतुपुरस्सर नुकसान पोहोचवल्याच्या खुणाही आढळल्या. सध्याची रचना पूर्वीच्या मंदिरासारख्या वास्तुकलेच्या अवशेषांवरून बांधलेली दिसते, असेही पुरातत्व विभागाच्या अहवालात म्हटले आहे.

# चिंता आणि चिंतन



चिंता आणि चिंतन या दोन शब्दांमध्ये केवळ उच्चार आणि लेखनाचाच नव्हे, तर अर्थ आणि परिणामांचाही मोठा फरक आहे.संस्कृत साहित्यात यातील फरक एका प्रसिद्ध श्लोकाने सांगितला आहे:सजीवं दहते चिन्ता, निर्जीवं दहते चिता।। (चिंता जिवंत माणसाला जाळते, तर चिता मृतदेहाला जाळते)या दोन्ही शब्दांमधील मुख्य फरक खालीलप्रमाणे आहे:१. चिंता (उहळपींर / -पुळर्शींी थींीू)अर्थ: काळजी, भीती, किंवा सतत एखाद्या गोष्टीबद्दल मनात शंका/तणाव बाळगणे.स्वरूप: चिंता ही एक नकारात्मक भावना आहे. ती माणसाला आतल्या आत पोखरून टाकते आणि मानसिक स्वास्थ्य बिघडवते.परिणाम: जास्त चिंता केल्याने आरोग्यावर वाईट परिणाम होतो. ही मृतदेहावर रचल्या जाणाऱ्या 'चिता' (अग्नी देण्याचे स्थान) समान मानली जाते.२. चिंतन (उहळपींरप / उेप- ींशाश्रिरींळेप ी ऊशशि ढहळपज्ञळपस)



अर्थ: एखाद्या विषयावर, समस्येवर किंवा विचारांवर शांतपणे मनन करणे, विचार करणे.स्वरूप: चिंतन ही एक सकारात्मक आणि कृतीशील प्रक्रिया आहे. यातून समस्यांवर उपाय सापडतात.परिणाम: चिंतन माणसाला प्रगतीकडे घेऊन जाते. योग्य गोष्टीचे चिंतन केल्याने ज्ञान आणि समृद्धी प्राप्त होते.थोडक्यात सांगायचे तर:'चिंता' ही अस्वस्थता आणि भीती निर्माण करते, तर 'चिंतन' हे शांतता आणि योग्य मार्ग शोधण्यास मदत करते. चिंता करू नका, तर चिंतन करा, असा सल्ला दिला

# नीट पेपर फोट्यांच्या टोळ्या?

३ मे रोजी 'नीट' होणार होती. त्याच्या दहा दिवस आधीच मोटेगावकर आणि त्याच्या टोळीला प्रश्नपत्रिका मिळाल्या होत्या. राष्ट्रीय परीक्षा संस्थेसाठी याहून अधिक लज्जास्पद काही असू शकत नाही.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी असलेल्या 'नीट- यूजी' परीक्षेच्या पेपरफुटीने व्यवस्थेवरील विश्वासाला हादरा दिला आहे. रेणुकाई करिअर सेंटर अर्थात 'आरसीसी' या नावाने शिक्षणाचा धंदा सुरू केलेल्या शिवराज मोटेगावकर याला अटक झाली. त्याच्या मोबाईलमध्ये फुटलेली प्रश्नपत्रिका सापडली आणि 'आपण सांगितलेले सर्व प्रश्न परीक्षेत आले' या संभाषणाचा व्हिडिओ देखील केंद्रीय गुप्तचर विभागाने जप्त केला आहे. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचे कागदोपत्री दाखवायचे, प्रत्यक्षात उपस्थिती खासगी शिकवणी वर्गात, हे अलीकडच्या काळात समीकरण बनले आहे. या फसवणुकीत संबंधित महाविद्यालयांचाही सहभाग आहे; पण शिक्षणाचा बाजार मांडणारे एवढे निर्ढावले आहेत, की त्यांना सरकारी यंत्रणातील अधिकार्यांना खूश ठेवून यंत्रणा दावणीला बांधता येतात. खालपासून वरपर्यंत व्यवस्था किती किडलेली आहे, याचे जळजळीत दर्शन नीटच्या पेपरफुटीमुळे झाले. सरकारकडून मान्यता असलेला बारावी अभ्यासक्रम असताना सीईटी आणि नीटचा जन्म, हेच संशयास्पद होते. आर्थिक लाभासाठी अशा परीक्षा अनेकांना

NTA- राष्ट्रीय परीक्षा एजेंन्सी



प्रदिपकुमार जोशी



शिवराज मोटेगावकर




मनिषा मांढरे



पी.व्ही. कुलकर्णी

फायद्याच्या ठरल्या. खासगी शिकवणी वर्ग आणि त्यांचे जाळे हे प्रमुख लाभार्थी. एखाद्या गोष्टीचा उदोउदो झाल्यावर त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवायचा, हे समाजाच्या मानसिकतेत मुरले आहे.'लातूर पॅटर्न' बद्दल तेच झाले. 'लातूर पॅटर्न'च्या नावाखाली शिक्षण क्षेत्रात संघटित गुन्हेगारांच्या टोळ्या तयार झाल्या, त्यांनी आपली पाळेमुळे सर्वत्र रुजवली आणि हजारो विद्यार्थी-पालकांकडून कोट्यवधी रुपयांच्या उत्पन्नाचा कायमचा स्रोत तयार केला. एखाद्या व्यवसाय- उद्योगाच्या वेगवेगळ्या ठिकाणी शाखा असाव्यात याप्रमाणे खासगी शिकवणी वर्गांच्या शाखा सर्वत्र दिसू लागल्या. ज्या यंत्रणेने सर्वोच्च खबरदारी घेत नीट परीक्षा पारदर्शक रीतीने घ्यायची तीच यंत्रणा पेपरफुटीच्या गुन्ह्यात आरोपीच्या पिंजर्यात आहे. शिक्षणाचा बाजार-संसदीय समितीने आता 'एनटीए'च्या अध्यक्षांना नोटीस बजावली आहे. ही नोटीस 'एनटीए'तील तज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आहे. वास्तविक शिक्षण विभागाची पुरती नाचक्की झाल्यावर या समितीच्या अध्यक्षांसह कथित तज्ज्ञांनी तातडीने पायउतार होणे आवश्यक होते. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तोंडात मिठाची गुळणी धरली आहे. तज्ज्ञ समित्यांवर सदस्यांची निवड कशाप्रकारे केली जाते, हेही जगजाहीर आहे; पण किमान देशाचे भविष्य असलेल्या तरुण पिढीशी संबंधित बाबींपासून गैरकारभाराची मानसिकता दूर राहावी, अशी अपेक्षा वावगी नाही. ती देखील पूर्ण होत नाही. इतिहासाच्या अभ्यासक्रमातील बदल अथवा तत्सम विषयांवर केंद्र सरकार जेवढी तत्परता दाखवते तेवढी लाखो विद्यार्थ्यांशी संबंधित विषयांवर का दाखवली जात नाही? एकीकडे विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ सुरू ठेवायचा आणि दुसर्या बाजूला पाठ्यक्रमात बदल करण्याबाबत अनाकलनीय घाई करायची, हे सुरू आहे. ते प्राधान्यक्रम असतील आणि भ्रष्टाचाराची साखळी तुटणार नसेल, तर पुढच्या काळातही आजचीच परिस्थिती कायम राहणार आहे. नीटच्या पेपरफुटीबाबत जी - जी नवी माहिती पुढे येत आहे ती समाजातील विचारी घटकाला कमालीची अस्वस्थ करणारी आहे. पेपर विकत घेऊन वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेले आणि डॉक्टर होणारे कोणती वैद्यकीय सेवा देणार आहेत? अभ्यासक्रमांचे महागडे शुल्क आणि त्याआधी खासगी शिकवणी वर्गासाठी मोजलेले, परीक्षेचा पेपर विकत घेण्यासाठी 'शिक्षण गुरूं'ना दिलेले लाखो रुपये याची भरपाई ते कशा रीतीने करतील हे वेगळे सांगायला नको. लाखो रुपये मोजून नामांकित शिकवणी वर्गात प्रवेश घेतलेल्यांपैकी अनेकांना याउपर देखील जे शिकवले गेले त्यावर विश्वास नसेल, पेपर विकत घेण्याची मानसिकता असेल तर काय बोलणार? या मानसिकतेचे विद्यार्थी स्वतःच्या जिवावर पेपर मिळवण्याची उलाढाल करू शकत नाहीत हे उघड आहे. त्यांचे पालक यामध्ये सक्रियपणे सहभागी आहेत. हे नासलेले घटक घेऊन समाजाची वाटचाल सुरू असून त्यामध्ये तात्कालीक उद्रेक होऊन बदल घडणार नाही, हे समजून घ्यावे लागेल.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



### स्ट्रॉबेरी



जेव्हां आपण फळांचा विचार करतो तेव्हा स्ट्रॉबेरी त्वचेकरता आणि स्वस्थ त्वचेकरता सगळयात जास्त लाभदायक आहे. स्ट्रॉबेरी अँटी एजिंग व्हिटामीन सी ने पुरेपुर असते ज्यामुळे चेहे-यावर सुरकुत्या पडत नाहीत आणि कोरडया त्वचेपासुनही मुक्ती मिळते. व्हिटामीन सी पेस्की मुक्त रॅडिकल्स आणि अणुंशी लढण्यात साहाय्यक आहेत जे आपल्या त्वचेला हानी तर पोहोचवतातच **(क्रमशः)**

## २ Joke विनोद




अजय : माझे घड्याळ एक मिनिटसुद्धा मागे-पुढे जात नाही.
विजय : वा ! छान. कुठं विकत घेतलंस?
अजय : अरे कसलं छान, घेतल्यापासून बंदच आहे.

## ३ Message संदेश



Banta dairy likh raha tha “aaj meri behan ko baccha hone wala hai pata nahi ladka hoga ya ladki, isliye mujhe ye bhi pata nahi ki me mama banunga ya mami”.

## ४ Thought सुविचार



पुष्कळ वेळा अबोल नजरही बोलकी असते.

\- ओव्हिड


**संस्कृत सुभाषित**

**प्राणाः प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।**

मराठीत अर्थ

अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### बांगलादेशने चारली पाकिस्तानला धूळ

दिल्ली–वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या म्हणजेच ऊण च्या पॉइंट टेबलमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. तुलनेने दुबळ्या मानल्या जाणाऱ्या बांगलादेश ने कसोटी मालिकेत पाकिस्तान संघाला पराभूत करत मोठा धक्का दिला. या निकालाचा परिणाम भारतावरही झाला असून भारतीय संघ ऊण क्रम वारीत एका स्थानाने खाली घसरला आहे.
दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत बांगलादेशने पाकिस्तानवर २–० असा विजय मिळवला. आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतर्गत खेळल्या गेलेल्या या मालिकेनंतर ऊण पॉइंट टेबलम ध्ये मोठा बदल झाला आहे. या बदलानुसार भारतीय संघ आता पाचव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरला आहे, तर पाकिस्तान सातव्या स्थानावरून आठव्या स्थानावर गेला आह. यात बांगलादेशने सहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. बांगलादेशने दुसऱ्या कसोटी सामन्यात पाकिस्तानचा ७८ धावांनी पराभव केला. याआधी म ीरपूरमध्ये झालेल्या पहिल्या कसोटीतही बांगलादेशने पाकिस्तानला १०४ धावांनी हरवले होते. या दोन विजयांमुळे बांगलादेशला ऊण गुणतालिकेत मोठा फायदा झाला.

### टीम इंडिया मोठा झटका

मुंबई–मायदेशात पाकिस्तान क्रिकेट संघाविरुद्धच्या कसोटी मालिकेत बांगलादेशनं मिळवलेल्या २–० अशा निर्भेळ विजयामुळं भारतीय क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघ जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या क्रमवारीत सहाव्या स्थानावर घसरला आहे. दुसऱ्या कसोटीत बांगलादेशनं पाकिस्तानचा ७८ धावांनी पराभव केला, तर त्यापूर्वी मिरपूर इथं झालेली पहिली कसोटी १०४ धावांनी मोठ्या फरकानं जिंकली होती. यामुळं आयसीसी डब्ल्यूटीसीच्या क्रमवारीत भारताला मागे टाकण्यात संघाला मदत झाली आहे.
बांग्लादेशचे ५८ टक्के गुण वाढले : बांग्लादेशनं चार कसोटी सामन्यांत दोन विजय, एक पराभव आणि एक बरोबरीसह ५८.३३ टक्के गुण मिळवले आहेत, तर भारतानं नऊ कसोटी सामन्यांत चार विजय, तितकेच पराभव आणि एक बरोबरीसह ४८.१५ टक्के गुण मिळवले आहेत. पहिल्या दोन जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचलेला भारत आता आशियाई क्रमवारीत पाकिस्तानच्या वर आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघानं यावर्षी अद्याप एकही कसोटी सामना खेळलेला नाही.

### क्रिकेटवर बोलण्याऐवजी तुम्ही...रियान पराग कॉमेंटेटरवर संतापला

मुंबई–राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग आयपीएल २०२६ दरम्यान होत असलेल्या टीका आणि वैयक्तिक आरोपांवर नाराजी व्यक्त केली आहे. खेळाडूंच्या वैयक्तिक आयुष्यावर टीका करण्याऐवजी क्रिकेटवर बोला, असं रियान पराग कॉमेंटेटर्स आणि क्रिकेट एक्सपर्ट्सना म्हणाला आहे.
राजस्थान रॉयल्सने मंगळवारी जयपूरमध्ये लखनऊ सुपर जाएंट्सवर विजय मिळवला, त्यानंतर रियान पराग बोलत होता. या मोसमात क्रिकेटपेक्षा जास्त मैदानाबाहेरच्या गोष्टींची चर्चा होत आहे. खेळाडू प्रत्येक मॅचआधी अनेक दिवस तयारी करतात, पण खराब दिवस कोणाचाही येऊ शकतो, असं रियान पराग म्हणाला आहे.मपूर्ण देश क्रिकेटवर प्रेम करतो, आम्ही खेळाडूही प्रत्येक मॅचमध्ये आपलं सर्वोत्तम द्यायचा प्रयत्न करतो. पण जर एखादी टीम ७५–८० रनवर ऑलआऊट झाली तर लगेच यांना खेळता येत नाही, यांची मानसिकताच खराब आहे, असं बोललं जातं. पण त्या मॅचआधी ३–४ दिवसांपर्यंत २००–२५० रन करण्याची तयारी केली जाते, हे लोक बघत नाहीतफ असं वक्तव्य रियान परागने केलं आहे.

### हेन्रिक क्लासेन प्रकरणावर संजू सॅमसनचे स्पष्टीकरण

मुंबई–चैन्नई सुपर किंग्ज विरुद्ध सनराइझर्स हैदराबाद यांच्यामध्ये महत्वाचा सामना चेपॉकच्या मैदानावर खेळवण्यात आला होता. या सामन्यामध्ये एसआरएचच्या संघाने बाजी मारली होती आणि प्लेऑफमध्ये स्थान पक्के केले आहे. या सामन्यामध्ये एसआरएचचा फलंदाज हेनरिक क्लासेन आणि सीएसकेचा संजू सॅमसन यांच्यावर चालू सामन्याम ध्ये बाचाबाची झाली होती. संजू सॅमसन याला त्याच्या चाहत्यांनी पहिल्यांदाच मैदानावर रागात पाहिले. सामन्यादरम्यान हेनरिक क्लासेन याला स्टंप आऊट केल्यानंतर या दोघांमध्ये बाचाबाची झाली होती. यामध्ये आता दोन्ही खेळाडूंनी सोशल मिडियावर या वादा संदर्भात स्पष्टीकरण दिले आहे. संजू सॅमसन याने त्याच्या सोशल मिडियावर दोघेही एकमेकांना मिठी मारतानाचा एक फोटो शेअर केला आहे यामध्ये त्याने लिहीले आहे की, मैदानावर अनेक गोष्टी घडत असतात, पण मैदानाबाहेर आम च्या दोघांमध्ये एकमेकांबद्दल खुप प्रेम आणि आदर असे त्याने लिहीले आहे. त्याने या फोटो आणि कॅप्शन लिहून यावर पार्श्वभूमीत २०२४ च्या तमिळ चित्रपट ममैय्याझगनफमधील मद सायकलफहे गाणे देखील लावले आहे. हेनरिक क्लासेनची वाद–ावर पोस्ट सोशल मिडियावर हेनरिक क्लासेन याने लिहीले आहे की, खुप आदर आणि खुप प्रेम मित्रा. तुला पाहून नेहमीच चांगले वाटते.

## हिंदकेसरी स्पर्धेला वादाची किनार, जाणूनबुजून दुखापतीचा आरोप

सातारा, (वार्ताहर) :
सातार्यातील छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात पार पडलेल्या ५२ व्या हिंद केसरी स्पर्धेच्या अंतिम लढतीत महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ जखमी झाला. हात हलवता येत. नसल्याने मोहोळने माघार घेतली. त्यानंतर सोलापूरच्या बाहुबली महेंद्र गायकवाडला हिंद केसरी घोषित करण्यात आले. मानाची हिंद केसरी गदा आणि थार गाडीचा महेंद्र गायकवाड मानकरी ठरला. या कुस्तीमध्ये वाद पाहायला मिळाला. याबाबत पृथ्वीराज मोहोळ याने सोशल मीडियाद्वारे व्हिडीओ पोस्ट करत महेंद्रने जाणूनबुजून दुखापत केली. काका पवार, गोविंद पवार यांचे माझ्याकडे व्हिडीओ आणि ऑडिओ असल्याचा दावा त्याने केला आहे.
कुस्ती झाल्यापासून सर्वांचे फोन आले पण कोणासोबतही बोलता आलं नाही. सर्वांनी प्रेम दाखवलं त्याबद्दल सर्वांचे धन्यवाद. काल झालेली कुस्ती सर्वांनी पाहिली, अनलिगल होल्ड झाला आणि त्याने दुखापतीचा पूर्ण प्रयत्न झाला. सर्व महाराष्ट्राच्या जन–तेने पाहिले. सीटीस्कॅन आणि एमआरआयला वेळ लागला. दुखापत जास्त झाली असून हात क्रॅक झाला आणि लिगामेंटलाही लागले आहे. मला काल बोलता आलं नाही, दवाखान्यात जावं लागलं. मी आज पुण्यात आल्यावर पाहिलं चुकीचीमाहिती पसरवली गेली आहे. त्यांनी सर्व लपवून ठेवलं आहे, त्यांचे वस्तादअसतील गोविंद पवार, काका पवार आणि तिथे



बसलेले त्यांचे समर्थक होते. मी व्हिडीओ ऑडिओ क्लिप दाखवेल, हात चढव आणि वर अजून घे हात हे सर्व जनतेने पाहिले असून मला बोलायची गरज नाही. सगळ्यांसमोर रिपोर्ट दाखवेल मला भरपूर लाग–लेलं आहे. सर्वांचे स्वप्न नक्की पूर्ण करेल, सर्वात कमी वयाचा हिंद केसरीच्या फायनलला मी असावा. अशा पद्धतीने कुस्ती झाल्यान मलाही दुःख होत आहे. याआधीही या पैलवानाने माझ्यासोबत असेच केलेले आहे. यावर्षीची महाराष्ट्र केसरी फायनलाही असेच केलेले आहे. सगळे बोलून दाखवायचे नसते. काल जे घडले पैलवानाला आणि वस्तादांना चांगले वाटत असे तर त्यांचे आभार, असे म्हणत पृथ्वीराज मोहोळ याने थेट काका पवारांवर टीका केली.
तीनवेळा उपमहाराष्ट्र केसरी राहिलेला महेंद्र गायकवाड हा सातार्यातील ५२व्या हिंद केसरी स्पर्धेत देशाचा ३९ वा आणि महाराष्ट्राचा १० वा हिंदकेसरी ठरला. उपांत्य फेरीत पृथ्वीराज मोहोळ आणि महेंद्र गायकवाडने उत्तर भारतीय मल्लांचे आव्हान मोडीत काढून दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला. दोघेही पैलवान महाराष्ट्राचेच असल्याने हिंद केसरीची गदा आणि बक्षिसाची थार गाडी कोणाला मिळणार, याची कुस्ती शौकिनांना उत्सुकता लागली होती.
लढतीच्या सुरुवातीलाच पृथ्वीराज मोहोळने आक्रमक चाल करत दोन गुण वसूल केले. मात्र, त्यानंतर महेंद्र गायकवाडने एकेरी पट काढतपृथ्वीराजला खाली घेतले. या अटीतटीच्या लढतीत पृथ्वीराजचा उजवा हात दुखावला. त्यामुळे आखाड्यात काही काळ तणाव निर्माण झाला. वैद्यकीय मदत देण्यात आली. काही वेळाने पुन्हा कुस्ती सुरू करण्यात आली. मात्र, हात हलवता येत नसल्याने पृथ्वीराज मोहोळने लढत सोडली.
पृथ्वीराजने लढतीतून माघार घेतल्यानंतर पंचांनी बाहुबली महेंद्र गायकवाडला हिंद केसरी घोषित केलं. त्यावेळी त्याच्या समर्थकांनी एकच जल्लोष केला.मान्यवरांच्या हस्ते महेंद्र गायकवाडला हिंद केसरीची गदा आणि थार गाडीच्या चाव्या देण्यात आल्या. दरम्यान, हिंद केसरी लढतीत निकाली कुस्ती पाहायला न मिळाल्याने कुस्तीशौकिनांना मोठी निराशा झाली.

## कोलकाताचा मुंबईवर सहज विजय!

गुणतालिकेत पंजाबची केली बरोबरी; प्लेऑफच्या शर्यतीत मोठा ट्विस्ट
घघठ ती चख: मुंबई इंडियन्स आणि केकेआर यांच्यातील कमी धावसंख्येचा सामना चांगलाच अटीतटीचा झाला.
: कोलकाता नाईट रायडर्सने घरच्या मैदानावर मुंबई इंडियन्सचा ४ विकेट्सने सहज पराभव केला. मुंबईविरूद्धच्या या विजयानंतर केकेआरचे प्लेऑफ गाठण्याची शक्यता अधिक वाढली आहे. कोलकाताचा संघ आता पंजाब किंग्सच्या बरोबरीत आला असून दोन्ही संघांचे ६–६ गुण आ–हेत. याशिवाय केकेआरचा रन रेटदेखील आता प्लसमध्ये आला आहे. त्यामुळे केकेआरला स्पर्धेतील अखेरचा सामना जिंकत प्लेऑफमध्ये जाण्याची सुवर्णसंधी आहे.
अंगक्रिश रघुवंशीच्या जागी कन्कशन सबस्टिट्यूट तेजस्वी दहिया या अनकॅप्ड खेळाडूला खेळण्याची संधी मिळाली. तेजस्वी दहियाला विकेटकिपिंगनंतर फलंदाजीची संधी मिळाली. संघाला ३० चेंडूत ३० धावांची गरज असताना तो फलंदाजीला आला आणि दुसऱ्या चेंडूवर त्याच्या ग्लोव्हजची कड घेत चेंडू चौकारासाठी गेला.
मुंबईने दिलेल्या १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरला पहिल्याच षटकात धक्का बसला. दीपक चहरने फिन



एलनला क्लीन बोल्ड करत मुंबईला मोठी विकेट मिळवून दिली. अंगक्रिश रघुवंशीला दुखापत झाल्याने तो पहिल्या डावात मैदानाबाहेर गेला होता. त्यामुळे मनिष पांडे तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणे २१ धावा करत बाद झाला. तर कॅमेरून ग्रीन ४ धावांवर माघारी परतला.वैभव सूर्यवंशीचा वर्ल्ड रेकॉर्ड! टी–२० इतिहासात अशी कामगिरी करणारा जगातील सर्वात तरूण फलंदाज ग्रीननंतर आलेल्या रोव्हमन पॉवेलने पहिल्याच चेंडूवर षटकार मारत आपले मनसुबे जाहीर केले. मुंबईने तयार केलेला सर्व दबाव पॉवेलने आपल्या एकापेक्षा एक चौकारांनी कमी केला. ज्याला मनिष पांडेने चांगली साथ दिली. पॉवेलला झेलबाद करण्याची मोठी संधी होती. पण दीपच चहर व रॉबिन मिंज यांनी एकमेकांकडे पाहत हा झेल सोडून दिला. ज्याचा मुंबईला चांगलाच फटका बसला. मनिष पांडे ६ चौकारांसह ४५ धावांची खेळी करत बुमराहच्या गोलंदाजीवर बोल्ड झाला. गझनफरने यानंतर रोव्हमन पॉवेलला ४० धावांवर झेलबाद केलं. अखे–रीस रिंकू सिंहने चौकार मारत केकेआरच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. मुंबईकडून कार्बिन बॉशने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. दीपक चहर, जसप्रीत बुमराह व गझनफर यांनी १–१ विकेट्स घेतल्या.
केकेआरने नाणेफेक जिंकत प्रथम मुंबई इंडियन्सला फलंदाजीसाठी पाचारण केलं.

## आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत भारतीय खेळाडूंचे घवघवीत यश



ओसाका : जपान देशांतील ओहामा दायशीन अरिना स्टेडियम, सकाई, ओसाका येथे नुकत्याच पार पडलेल्या २२ व्या आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत पुण्यातील भोसलेज् तायक्कांदो न्ड फिटनेस असोसिएशन आणि योधी तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केलं आहे. ग्रँड मास्टर चंद्रकांत भोसले, मास्टर राजेश पुजारी, मास्टर बाबू राजन, मास्टर स्वाती खुर्जेकर, मास्टर राजीव नाईक आणि टीम लीडर अमिद इस्माईली या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी झालेल्या ३३ देशांच्या खेळाडूंशी व्यक्तिगत चुरस देत कौतुकास्पद यश संपादन केले आहे.
पुमसे आणि कोरियोगी या खेळा प्रकारात खेळाडूंनी अनुक्रमे यश संपादन केलं आहे. नक्ष कुटे ( रौप्य, कांस्य), स्वरा जैस्वाल (रौप्य,रौप्य), वेदिका पुजारी (कांस्य, कांस्य), देवकी परदेशी (कांस्य, कांस्य), मयुरी मोरे (रौप्य,कांस्य), जिया शहा (रौप्य), गौतम पुराणिक (कांस्य, कांस्य), तुर्यागा कुलकर्णी (कांस्य), सोनिया देशपांडे (रौप्य), वरद तुळपुळे (सुवर्ण), आकाश तुपसुंदर (सुवर्ण,रौप्य), योगेश ठीक (सुवर्ण), राजीव नाईक (रौप्य) अशी पदक विजेत्या भारतीय खेळाडूंची नावे आहेत. ग्रँड मास्टर चंद्रकांत भोसले आणि मास्टर राजेश पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली गेली १५ – १६ वर्षांपासून सातत्याने भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत आपल्या भारत देशाचं नाव यशस्वीपणे उंचावत आहेत.

## प्रो लीगमध्ये भारत–पाकिस्तान महामुकाबला

नवी दिल्ली : अम्माद शकील बट याने आगामी एफआयएच प्रो लीग आणि २०२६ हॉकी विश्वचषकात भारताविरुद्ध जोरदार लढत देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पाकिस्तान पुरुष हॉकी संघाचा कर्णधार असलेल्या बटने भारत हा अत्यंत मजबूत प्रतिस्पर्धी असल्याचे मान्य करत, यावेळी पाकिस्तानचा संघ विजयासाठी पूर्ण तयारीत असल्याचे सांगितले.बट म्हणाला, आम्ही बराच काळ भारताविरुद्ध अपेक्षित निकाल मिळवू शकलो नाही. त्यामुळे यावेळी संघाने विशेष मेहनत घेतली आहे. भारताला पराभूत करण्यात यश मिळाल्यास संघाचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढेल.
एफआयएच प्रो लीगच्या चौथ्या टप्प्यात भारत आणि पाकिस्तान यांच्यात २३ आणि २८ जून रोजी इंग्लंडमध्ये दोन सामने होणार आहेत. त्यानंतर



१९ ऑगस्टला २०२६ पुरुष एफआयएच हॉकी विश्वचषक हे दोन्ही कट्टर प्रतिस्पर्धी आमनेसामने येतील.
बटने सांगितले की, भारताविरुद्धचे सामने नेहमीच रोमांचक आणि चुरशीचे असतात. भारत मजबूत संघ आहे, पण पाकिस्तानचाही संघ सक्षम आहे. आम्ही विजयासाठी सर्वोत्तम प्रयत्न करू, असे तो म्हणाला. आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पाकिस्तानने हॉकी विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आहे. १५ ते ३० ऑगस्टदरम्यान बेल्जियम आणि नेदरलँड्समध्ये ही स्पर्धा रंगणार आहे.

## अखेरच्या स्वप्नासाठी ख्रिश्तीनो रोनाल्डो सज्ज

फिफा वर्ल्ड कप २०२६ साठी पोर्तुगाल राष्ट्रीय फुटबॉल संघटनाने अंतिम संघ जा–हीर केला आहे. या संघाचे नेतृत्व अनुभवी स्टार क्रिस्टियानो रोनाल्डो (उीळीींळरपे ठेपरश्रवे) करणार आहे. ४१ वर्षांच्या रोनाल्डोचा आपल्या करियरचा हा शेवटच्या वर्ल्ड कप ठरु शकतो.
पोर्तुगालला विजेतेपद मिळवून देण्याच्या निर्धाराने रोनाल्डो मैदानात उतरणार आहे. फुटबॉल इतिहासातील महान खेळाडूंपैकी एक मानला जाणारा रोनाल्डो याचा हा सहावा वर्ल्ड कप असणार आहे. २००६ च्या वर्ल्ड कपमध्ये पोर्तुगालने उपांत्य फेरी गाठली होती, मात्र त्यानंतर संघाला त्या पलीकडे जाता आले नाही.
नॉकआऊट सामन्यात रोनाल्डोला आतापर्यंत केवळ एकच गोल मारता आला आहे, त्यामुळे या वेळी विजेतेपद जिंकण्याचे त्याचे स्वप्न अधिकच तीव्र झाले आहे.
प्रशिक्षक म्हणून मार्टिनेझ यांची भूमिका २०२२ विश्वचषकानंतर पद सोडलेल्या ऋशीपरपवे डरपींी यांच्या जागी जानेव–ारी २०२३ मध्ये रॉबर्टो मार्टिनेझ यांनी पोर्तुगालच्या मुख्य प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारली. यापूर्वी त्यांनी इशश्रसळीा परींळेपरश्र षीं–लरश्र ींशरा चेही नेतृत्व केले होते. मार्टिनेझ यांच्या



मार्गदर्शनाखाली पोर्तुगालने णएऋ–छरींळेपी डशरसींश २०२४–२५ चे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी डरिळप ला पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभूत केले होते. विश्वचषकातील पोर्तुगालचा इतिहास पोर्तुगालच्या इतिहासातला हा ९ वा वर्ल्ड कप असणार आहे.१९६६ मध्ये इंग्लंड येथे झालेल्या वर्ल्ड कपमध्ये पोर्तुगालने तिसरे स्थान मिळवले होते. त्या स्पर्धेत महान फुटबॉलपटू एँीलळे याने सर्वाधिक गोल केले होते. दरम्यान, काही विश्लेषकांच्या मते संघातील युवा खेळाडू जोआओ नेवेस (गें छर्शींशी) आणि राफेल लिओ (ठरषरशश्र डर्शो) यांच्याकडूनही २०२६ च्या वर्ल्ड कपमध्ये मोठ्या अपेक्षा आ–हेत. पोर्तुगालसाठी ही स्पर्धा भावनिकही ठरू शकते. संघाचा माजी फॉरवर्ड ऊळेसे गोंर यांच्या निधनानंतर एका वर्षाने संघ जगातील सर्वात मोठ्या फुटबॉल स्पर्धेत विजेतेपदासाठी झुंज देणार आहे. पोर्तुगाल फुटबॉल असोसिएशनने जाहीर केलेले संघ :गोलकीपर: डिएगो कोस्टा, जोस सा, रुई सिल्वा, रिकार्डो वेल्हो.
डिफेंडर्स: डिएगो डालोट, मॅथियस नुनेस, नेल्सन सेमेडो, जोआओ कॅन्सेलो, नूनो मेंडेस, गोंसालो इनासियो, रेनाटो वेइगा, रुबेन डियास, टॉमस अराउजो.
मिडफिल्डर: रूबेन नेवेस, जोआओ नेवेस, विटिन्हा, ब्रुनो फर्नांडिस, बर्नार्डो सिल्वा, जोआओ फेलिक्स, फ्रान्सिस्को ट्रिनकाओ, फ्रान्सिस्को कॉन्सिसिओ, सामू कोस्टा.
फॉरवर्ड: पेड्रो नेटो, राफेल लिओ, गोंसालो गुएडेस, गोंसालो रामोस, क्रिस्टियानो रोनाल्डो.

## कर्णधारपद सोडल्यापासून मला कुणी विचारलंच नाही-तू कसा आहेस ?

बेंगळुरू : विराटने कसोटी कर्णधारपद सोडून आज ४ वर्षे उलटून गेली आहेत तरीही त्याच्या त्या निर्णयावर अजूनही बऱ्याच चर्चा रंगताना आपल्याला पाहायला मिळतात. अशातच आता स्वतः विराटने यावर भाष्य करताना म्हंटल की भारताच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळताना ९ वर्षांत कुणी नाही विचारले की तू कसा आहेस? आरसीबी इनोवेशन लॅबमध्ये बोल–ताना कोहलीने त्याच्या कर्णधारपदाच्या दिवसातल्या आठवणी आणि आपल्या मानसिक स्थितीबद्दल मोकळेपणाने सांगितले आहे.
नेमकं काय म्हणाला विराट ?
मी पूर्णपणे थकलो होतो. संघाची फलंदाजी आणि कर्णधारपदाचा ताण दोन्ही माझ्यावर होते. भारतीय क्रिकेटला सर्वोच्च स्थानावर ठेवण्याच्या ध्यासामुळे मी स्वतःकडे लक्षच दिले नाही. तो पुढे म्हणाला की कर्णधारपद सोडेपर्यंत तो मानसिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडला होता.
कर्णधारपद म्हणजे फक्त निर्णय नव्हे
कोहलीने सांगितले की कर्णधारपद म्हणजे फक्त मैदानावरील निर्णय घेणे नसते. खेळाडूंना समजून घेणे, त्यांच्याकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेणे आणि संघाची मानसिकता सांभाळणे हीही मोठी जबाबदारी असते. तुम्ही सतत अशा मानसिक स्थितीत असता



की स्वतःबद्दल विचार करण्यासाठी वेळच मिळत नाही. गेल्या जवळपास ९ वर्षांत कुणीही मला विचारले नाही की 'तू कसा आहेस? असे कोहलीने सांगितले.
२०१४ मध्ये पहिल्यांदा मिळाले नेतृत्व
२०१४ मध्ये चड उ्हेपळ दुखापतीमुळे बाहेर असताना ऑस्ट्रेलियाविरुद्ध –वशश्ररळवश जींरश्र येथे झालेल्या कसोटीत कोहलीने प्रथमच भारताचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. त्यानंतर २०१५ मध्ये तो कायमस्वरूपी कसोटी कर्णधार बनला होता.दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारताला १–२ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर कोहलीने जानेव–ारी १५ २०२२ रोजी अचानक कसोटी कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे भारतीय क्रिकेटमध्ये मोठी खळबळ उडाली होती.
कोहली–शास्त्री जोडीचा सुवर्णकाळ
रवि शास्त्री आणि कोहली यांच्या जोडीने भारतीय कसोटी क्रिकेटला नवी उंची मिळवून दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने २०१८–१९ मध्ये ऑस्ट्रेलियात ऐतिहासिक विजय मिळवत ईीवशी–ऱ्ीरीझरी ढीहि जिंकली. कोहली हा भारताचा सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार ठरला. त्याने ६८ कसोटी सामन्यांत भारताचे नेतृत्व केले, त्यापैकी ४० सामने जिंकले, तर त्याचा विजयाचा टक्का ५८.८२ इतका प्रभावी राहिला.

# उस्मानाबाद-लातूर-बीड निवडणुकीसाठी विविध समित्यांचे गठन




## तीन जिल्ह्यांतील २९ मतदान केंद्रांवर मतदान ; प्रारूप मतदार यादी सोमवारी प्रसिद्ध होणार

**धाराशिव/लातूर (जिमाका):** स्थानिक स्वराज्य संस्था (उस्मानाबाद-लातूर-बीड) मतदारसंघ निवडणूक प्रक्रिया सुरळीत,पारदर्शक आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे.या निवडणुकीत ३० नगर परिषदा,१ महानगरपालिका,२९ पंचायत समिती सभापती आणि ३ जिल्हा परिषदांचा समावेश असलेल्या एकूण ६३ स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधी मतदान करणार आहेत.एकूण ११३२ सदस्यांचा मतदार म्हणून समावेश असून त्यापैकी १०५१ सदस्य मतदानासाठी पात्र ठरले आहेत,अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिली.

स्थानिक स्वराज्य संस्था (उस्मानाबाद-लातूर-बीड) निवडणुकीसंदर्भात धाराशिव,लातूर व बीड जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक आज २० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली.यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिरीष यादव,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीणकुमार धरमकर यांच्यासह बीड व लातूर जिल्ह्यातील संबंधित अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की,निवडणुकीची अधिसूचना सोमवार, दि.२५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे.नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवार,दि.१ जून २०२६ असून छाननी मंगळवार,दि.२ जून रोजी होणार आहे.उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख गुरुवार,दि.४ जून निश्चित करण्यात आली आहे.मतदान गुरुवार, दि.१८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार असून मतमोजणी सोमवार,दि.२५ जून रोजी करण्यात येणार आहे.

आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देताना जिल्हाधिकारी पुजार यांनी सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले राजकीय स्वरूपाचे होर्डिंग तत्काळ हटविण्याचे आदेश दिले.तसेच आचारसंहितेच्या कालावधीत कोणत्याही राजकीय सभा घेता येणार नसल्याचे स्पष्ट केले.

या निवडणुकीत बीड जिल्हा परिषदेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने तेथील सदस्य मतदानातून वगळण्यात आले आहेत. धाराशिव व लातूर जिल्हा परिषदेचे निवडून आलेले सदस्य,स्वीकृत सदस्य,नगरसेवक,स्वीकृत नगरसेवक आणि पंचायत समिती सभापती यांनाच मतदानाचा अधिकार राहणार आहे. पंचायत समिती सदस्य तसेच ज्या जिल्हा परिषदांनी स्वीकृत सदस्यांची निवड उशिरा केली आहे,त्यांना मतदान प्रक्रियेतून वगळण्यात आले असल्याचेही पुजार यांनी स्पष्ट केले.निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

आदर्श आचारसंहिता समितीचे नोडल अधिकारी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार,नगर परिषद प्रशासनाचे सहआयुक्त त्रिंबक ढेंगळे-पाटील,रंगनाथ कोलगने,महेश क्षिरसागर आणि सी.डी.नागरगोजे यांचा समावेश आहे

. मतदार यादी तयार करणे,छपाई व तीन जिल्ह्यांतील समन्वयासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक म्हणून तहसीलदार डॉ.मृणाल जाधव,नायब तहसीलदार सचिन पाटील,घृणेश्वर स्वामी,डाटा एन्ट्री ऑपरेटर शंकर खांडेकर व अरविंद भोंग यांचा समावेश करण्यात आला आहे.

नामनिर्देशन स्वीकृती कक्षासाठी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सहाय्यक म्हणून संतोष पाटील,दत्तात्रय मोरे,शहाजी माळी, महेश क्षिरसागर,विशाल वाघमारे, कमलाकर झेंडे व हसनोदिन शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदान अधिकारी व कर्मचारी व्यवस्थापन कक्षासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे. सहाय्यक म्हणून रुपा बंगाली, प्रसाद टिळे,श्रीहरी गाढवे,विजय पाटील, शंभू पांचाळ,मंदार कदम आणि युसूफ पठाण यांचा समावेश आहे.

अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण व्यवस्थापन (जम्बो मतपेटी हाताळणी) समितीच्या नोडल अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अरुणा गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहाय्यक म्हणून तहसीलदार प्रकाश व्हटकर,नितीन चौधरी,सदानंद यादव,दत्ता ठाकूर,प्रमोद चंदनशिवे,विश्व प्रसाद गायकवाड,श्री.कुंभार व उषा माने यांचा समावेश आहे.

साहित्य मागणी,वितरण व स्ट्राँग रूम व्यवस्थापन समितीचे नोडल अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी (मध्यम प्रकल्प-०२) संतोष राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक म्हणून निकिता साकळे,नितेश काळे,अभिमन्यू गोरे,अंगद माने,संतोष चव्हाण,इलियास पठाण व इम्रान पठाण यांचा समावेश आहे.

मतपत्रिका छपाई व वितरण समितीसाठी उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीणकुमार धरमकर यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सहाय्यक म्हणून ज्योतीराम देवकर,बाळासाहेब पवार,शरद मोटे,डाटा एन्ट्री ऑपरेटर सूर्यकांत घोडके,यु. डी.राठोड व श्री.कुंभार यांचा समावेश आहे.

कायदा व सुव्यवस्था तसेच वाहन व्यवस्थापन समितीचे नोडल अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक अधिकारी म्हणून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,पोलीस निरीक्षक अमोद भुजबळ,चंद्रकांत गजभार,शिवराज धुळशेटे आणि गोकुळ बारगजे यांचा समावेश आहे.

मतमोजणी कक्ष तयार करण्याच्या समितीचे नोडल अधिकारी म्हणून उपजिल्हा निवडणूक अधिकारी (लातूर) गणेश पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक म्हणून उपविभागीय अधिकारी (धाराशिव),तहसीलदार डॉ.मृणाल जाधव,नायब तहसीलदार पंकज मंदाडे,महादेव शिंदे,रवी मोहिते,रवी भोंडे व श्रीकांत पांढरे यांचा समावेश आहे.

निवडणूक निरीक्षक व इतर अनुषंगिक व्यवस्था समितीचे नोडल अधिकारी म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शिवराम केत,राहुल माने, बाबासाहेब गाडे व के. एच.पाटील यांचा समावेश करण्यात आला आहे.

माध्यम व नियंत्रण समितीचे नोडल अधिकारी म्हणून जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक अधिकारी म्हणून नंदू पवार,आशा बंडगर, यु.फा.मोमीन व अनिल वाघमारे यांचा समावेश करण्यात आला आहे.

अवैध दारू वाटपास प्रतिबंधक कक्ष समितीचे नोडल अधिकारी म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून सहाय्यक अधिकारी म्हणून राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक राहुल बांगर व हरिभाऊ लांडे यांचा समावेश आहे.

विविध परवाने व चौकशी कक्ष (एक खिडकी) समितीचे नोडल अधिकारी म्हणून तहसीलदार (संगायो) दत्तात्रय गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सहाय्यक अधिकारी म्हणून धाराशिव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे,अमोद भुजबळ,संध्या कांदे,अर्चना बंगले आणि नानासाहेब मुंढे यांचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी दिली.

# ‘एल निनो’च्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यात ‘वैरण विकास योजना’ सुरू




**लातूर/प्रतिनिधी :** हवामान विभागाने यंदाच्या वर्षात ‘एल निनो’च्या प्रामुख्याने प्रभावामुळे पावसाचे असमान वितरण, कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविली असून या पार्श्वभूमीवर भविष्यात पशुखाद्य व हिरव्या चाऱ्याची गंभीर टंचाई निर्माण होवू शकते. ही संभाव्य टंचाई लक्षात घेऊन जिल्ह्यातील पशुपालकांनी आतापासूनच नियोजन करुन चारा उत्पादन वाढविणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. या समस्येवर मात करण्यासाठी सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत वैरण विकास योजना - चारा उत्पादक कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या योजनेतंर्गत पात्र पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर संकरीत मका व ज्वारी बियाणे पुरवठा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पशुपालकांनी या संधीचा लाभ घेऊन स्वतःच्या शेतामध्ये मोठ्या प्रमाणात हिरव्या चाऱ्याचे उत्पादन करावे आणि भविष्यातील टंचाई लक्षात घेऊन तयार होणारा चारा सायलेज, हाय किंवा चारा साठवण पद्धतीद्वारे जतन करून ठेवावा, असे आवाहनही जिल्हा पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

या योजनेची प्रमुख उद्दिष्टे भविष्यातील चारा टंचाई टाळणे, पशुधनासाठी वर्षभर पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध करणे, दूध उत्पादन वाढीस चालना देणे, पशुपालकांचे आर्थिक नुकसान कमी करणे आणि नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ परिस्थितीत पशुधन संरक्षण करणे ही आहेत. या योजनेतंर्गत वैयक्तिक शेतकरी व नोंदणीकृत शेतकरी समूह गटांना १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे व ठोंबे उपलब्ध करून दिले जाणार असून, त्यांना हिरवा चारा उत्पादनासाठी प्रोत्साहन आणि चारा साठवणुकीबाबत मार्गदर्शनही केले जाईल.योजनेच्या पात्रता निकषानुसार वैयक्तिक शेतकऱ्याकडे स्वतःची जमीन, सिंचन सुविधा, किमान ३ ते ४ पशुधन असणे आणि १ हेक्टर क्षेत्रावर चारा उत्पादन घेण्याची तयारी असणे आवश्यक आहे; तर शेतकरी समूह गटांसाठी नोंदणीकृत समूह गट असणे आवश्यक असून ५ हेक्टर क्षेत्राची मर्यादा लागू राहील. अनुदानाच्या स्वरूपाचा विचार केला असता, वैयक्तिक लाभार्थ्याला १ हेक्टरसाठी चार हजार रुपयांपर्यंत १०० टक्के अनुदान, तर शेतकरी समूह गटाला ५ हेक्टरसाठी २० हजार रुपयांपर्यंत अनुदान अनुज्ञेय राहील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सातबारा उतारा, लागू असल्यास वनहक्क प्रमाणपत्र, पशुधनाचा पुरावा आणि समूह गट नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास) ही आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे.

या योजनेतंर्गत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया दि. २० ते २८ मे २०२६ या कालावधीत सुरू राहणार असून, अर्जासाठीची गुगल फॉर्म लिंक जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. आज उत्पादित केलेला आणि योग्य पद्धतीने साठवून ठेवलेला चारा भविष्यातील दुष्काळ व टंचाई काळात पशुधनासाठी जीवनदायी ठरणार असल्याने प्रत्येक पशुपालकाने ही योजना गांभीर्याने घेऊन तात्काळ अर्ज करावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित तालुका पशुसंवर्धन कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना किंवा जिल्हा पशुसंवर्धन कार्यालय, लातूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. पडीले आर. डी. यांनी केले आहे.

## मान्सुनपुर्व नालेसफाई कामाची महापौरांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**लातूर/ प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे हाती घेण्यात आली असून आतापर्यंत शहरातील प्रमुख ८४ नाल्यांची स्वच्छता करण्यात आली आहे. जवळपास ७० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

लातूर शहरातील साळूंके नगर खाडगाव रिंग रोड, छत्रपती शाहू महाराज चौक येथील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामाची महापौर जयश्रीताई सोनकांबळे,नगरसेवक ड.फारूख शेख यांनी पाहणी केली. पावसाळ्यात कोठेही पाणी साचणार नाही व नागरिकांच्या घरात पाणी जाणार नाही याची दक्षता घेण्यास निर्देश केले. यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे , शिवराज शिंदे , अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक शिवाजी कुटकर,प्रदिप गायकवाड व कर्मचारी उपस्थित होते.



## पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहाराच्या चौकशीच्या मागणीसाठी धरणे आंदोलन : प्रदीप पाटील खंडापूरकर

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील खंडापूर येथे दि. २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्यासाठी देणगी स्वरूपात आलेल्या दहा कोटींपेक्षा जास्त रकमेचा अपहार किशोर जाधव व अन्य आयोजकांनी केला आहे . या प्रकरणातील दोषींवर अटकेची कार्यवाही करून आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी शुक्रवार दि. २२ मे रोजी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी दिली.

या पादुका दर्शन सोहळ्यात अंदाजे १० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. या निवेदनात खंडापूर येथे पार पडलेल्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संत खंडापूर येथे आले होते. या संतांच्या माध्यमातून १०० एकरच्या आवारात भव्य मंडप उभारण्यात आला होता. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तेलंगणा आदी भागातून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्याचा जवळपास ६० लाखांहून अधिक भाविकांनी आनंद घेतला होता. खंडापूरच्या या सोहळ्यासाठी मंत्री, आमदार, खासदार, माजी मंत्री, माजी आमदार, राजकीय नेते आणि अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी देणगी स्वरूपात दिला होता. सोहळ्यासाठी अंदाजे ३७०० देणगी पुस्तिका छापण्यात आल्या होत्या. प्रत्येक देणगी पावती पाच हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची आहे. सोहळ्यात दानपेटीत भाविकांनी टाकलेली रक्कम दहा पोत्यांमध्ये जमा करण्यात आली होती. जनतेने , दानशूर व्यापाऱ्यांनी या सोहळ्यासाठी तांदूळ, गहू, ज्वारी, साखर, तेल, दूध, तूप, मंडप, भाकऱ्या - पोळ्या अशा स्वरूपात देणगी दिली होती. तर एका भक्ताने स्वखर्चाने पादुका हेलिकॉप्टर मधून आणल्या होत्या. अंदाजे दहा कोटींपेक्षा जास्त रक्कम आणि धान्य या सोहळ्याच्या निमित्ताने जमा झाले होते. याचा सर्व व्यवहार किशोर जाधव शिवणीकर आणि अन्य आयोजकांकडे होता. यातील काही रकमा कल्यादिवशी जाहीर केल्या. पण सदरील पैशाचा हिशोब अद्याप दिलेला नाही. त्यामुळे संत, वारकरी, भक्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वारकऱ्यांच्या नावावर अशी फावणूक होत असेल तर संबंधितांशी कडक शासन झाले पाहिजे. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शुक्रवार, दि. २२ मे रोजी सकाळी नऊ वाजता लातूरच्या गांधी चौकात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी सांगितले.

# जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त सोलापूर विभागाची व्यापक मोहीम; वॉकाथॉनसह जनजागृती उपक्रमांना सुरुवात




**सोलापूर/ प्रतिनिधी:** सोलापूर विभाग, मध्य रेल्वेने हवामान बदल या विषयावर आधारित जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त १५ मे ते ५ जून २०२६ या कालावधीत व्यापक पर्यावरण जनजागृती मोहिमेची सुरुवात केली आहे. या मोहिमेचा उद्देश रेल्वे कर्मचारी, प्रवासी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान जागरूकता आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत जनजागृती करणे हा आहे.

ही विभागस्तरीय मोहीम सोलापूर, कलबुर्गी, वाडी, शहाबाद, पंढरपूर, कुर्डुवाडी, लातूर आदी प्रमुख स्थानके आणि रेल्वे वसाहतींमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जनजागृती कार्यक्रम, रॅली, स्वच्छता मोहिमा, वृक्षारोपण, परिसंवाद आणि सामाजिक सहभाग उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आहेत.

मोहिमेच्या प्रारंभी पर्यावरण व हाऊसकीपिंग व्यवस्थापन (EnHM) विभाग आणि सिव्हिल डिफेन्स पथकाच्या वतीने डीआरएम कार्यालय ते सोलापूर रेल्वे स्थानक दरम्यान वॉकाथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि पर्यावरण संवर्धनाबाबतची बांधिलकी अधोरेखित केली.


अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ADRM) सोलापूर श्री. अंशुमली कुमार यांनी उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली व वॉकाथॉनला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी त्यांनी सर्वांना पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत, भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वी अधिक हिरवी, स्वच्छ आणि शाश्वत करण्याचे आवाहन केले.

**या मोहिमेअंतर्गत उपक्रम राबविण्यात येत आहेत:**

*एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकविरोधात जनजागृती* स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणावर आधारित नुक्कड नाटक कार्यक्रम *कचरा वर्गीकरण व स्थानक स्वच्छता विशेष मोहिमा*पर्यावरणपूरक आणि प्लास्टिकमुक्त पर्यायांना प्रोत्साहन देणाऱ्या रॅली*प्लास्टिक प्रदूषणाबाबत सार्वजनिक जनजागृती घोषणाबाजी*पाणी भरण्याच्या ठिकाणांची तपासणी व जलस्रोत संवर्धन उपक्रम*ई-कचरा संकलन आणि ऊर्जा बचत उपक्रम*कर्मचारी व मुलांसाठी प्रश्नमंजुषा व चित्रकला स्पर्धा

*प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी व ज्यूटच्या पिशव्यांचा प्रसार *स्काऊट्स अँड गाईड्स, सिव्हिल डिफेन्स स्वयंसेवक व सामाजिक संस्थांच्या सहभागातून वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन **‘एक पेड माँ के नाम’** या विशेष वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन केले आहे.

ही मोहीम ५ जून २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त परिसंवाद आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव सोहळा आयोजित करून संपन्न होणार आहे. सोलापूर विभागाने रेल्वे कर्मचारी, प्रवासी आणि सर्वसामान्य नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे, ज्यामुळे स्वच्छ, हिरवे आणि शाश्वत पर्यावरण निर्माण करण्यास हातभार लागेल.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# भारतीय सशत्र सैन्य दलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

धाराशिव दि.१८ मे (जिमाका) भारतीय सैन्यदल,नौदल व वायुदलात अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Dervice (CDS) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक रोड,नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत उउ्ळ कोर्स क्रं. ६७ आयोजित करण्यात आले आहे.कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

तरी जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे ९ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करून त्यामधील उउ्ळ-६७ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेश मिळण्यासाठी खालील पात्रता असणे आवश्यक आहे व त्या संबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेऊन यावेत.

एस.एस.बी वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमुद कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेवून यावेत.उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.उमेदवार लोकसंघ आयोग (UPSC) नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. (CDS) या परीक्षेकरिता ऑनलाईन द्वारे अर्ज केलेला असावा.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी,छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी: training.pctcnashikgmail.com व दुरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र.९१५६०७३३०६ असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

# उमरगा बसस्थानकामध्ये शेडची जागा पुरेना प्रवाशांना झाडांखाली घ्यावा लागतोय अडोसा

उमरगा(प्रतिनिधी)-उमरगा शहर हे महाराष्ट्र कर्नाटक सीमे वरील शेवटचे शहर असून येथील बाजारपेठ नेहमी गजबज लेली असतें. हे शहर राष्ट्रीय महामार ्गांवर असल्याने येथील बसस्थान कामध्ये नेहमी गर्दी असते. काही दिवसा ूर्वी उमरगा बसस्थ नकाची इमारत पाडण्यात आली असून नवीन इमारतीचे काम करण्यात येणार आहे. परंतु सद्य स्थितीत प्रवाशांना अपुऱ्या सोयीमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. उमरगा तालुक यातील नागरिकांचा बहुतांश गावांचा दररोज संपर्क उमरगा शहरांशी येतो. उमरगा तालु ्याव ्याव लोहारा, निलंगा व औसा तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागातील विद्यार्थी, नागरिक व हॉस्पिटलसाठी उमरगा येथे येत असतात. उमरगा हे मोठी बाजारपेठ असल्याने येथील बसस् थानक नेहमी गजबज लेले असते. उमरगा बसस्थ नकाची इमारत कसलीही पर्यायी व्यवस्था न करता पाडण्यात आली आहे. सध्या उन्हा ्याचे दिवस असल्याने व उन्हाचा भयंकर उकाडा असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. प्रवाश ांसाठी एक तात्पुरते पत्र्याचे शेड उभार ्यात आले असले तरी त्या



निवार् ामध्ये केवळ ३० ते ४० प्रवासी बसू शकतील अशी व्यवस्था सुद्धा करण्यात आलेली नाही. उन्हाच्या तडाख्याने त्या शेडमध्ये प्रवाशांचे हाल होत आहेत. परिसरात असले ल्या दोन झाडाच्या सावली मध्ये कसे बसे गर्दीत बसून प्रवाशी बसची वाट पाहत ताटकळत बसत आहेत. बसस् थानक परिसरात तात्पुरत्या स्वरूपात पाण्याची टाकी बसवून पिण्याच्या पाण्याची सोय करणे अपेक्षित असताना कसलीही पाण्याची सोय न केल्याने कडक उन्हामध्ये प्रवाशांचे हाल होत आहेत. बसस् थानक परिसरात तात्पुरत्या स्वरूपात प्लॅटफॉर्म उभा करणे अपेक्षित होते. परंतु तसे काहीही न केल्याने बसला नाम फलक नसल्याने प्रवासी थेट चालक व वाहक कडे चौकशी करत आहेत. महिला प्रवाशांची अधिक अडचण उमरगा बसस्थानकातील सध्याची परिस्थिती अत्यंत अमानुष झाली आहे. पर्यायी व्यवस्था नसताना बसस्थानक पाडल्याने प्रवाशांना उन्हात उभे राहावे लागत आहे. पिण्याचे पाणी, सावली, स्वच्छतागृहे यांचा अभाव आहे. त्यातच बसेस वारंवार बंद पडणे, नियोजित फेऱ्या रद्द होणे आणि वेळापत्रकाचा बोजवारा उडाल्याने विद्यार्थी, रुग्ण, महिला व ग्रामीण प्रवासी प्रचंड त्रस्त झाले आहेत. -ॲड. शीतल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते नाममात्र निधी वापरून प्रवाशांची दिशाभूल शासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात प्रवासी निवारा व प्रवाशांच्या सोयीसाठी आलेला निधी नेमका किती होता व किती खर्च करण्यात आला हे महत्वाचे आहे. नाममात्र निधी खर्च करून प्रवाशांना अपुऱ्या सोयी-सुविधा देऊन प्रशासन प्रवाशांची दिशाभूल तर करत नाही असा सवाल नागरिक करत आहेत. प्रवाशांना चांगल्या सोयी सुविधा पुरवणे हे एसटी प्रशासनाचे कर्तव्य असताना असे बेजबाबदारपणे प्रवाशांचे हाल करणाऱ्या अधिकाऱ्यांना शासन आणखी किती काळ पोसणार आहेत.

# ३० जूननंतर HSRP नसलेल्या वाहनांवर कारवाईचा बडगा; सरकारचा स्पष्ट इशारा ! जुनी वाहने धारकांनी तात्काळ HSRP बसवा, अन्यथा दंडात्मक कारवाई अटळ

धाराशिव (रामेश्वर डोंगरे ) राज्यातील लाखो वाहनधारकांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले आहे की, दि. ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांना आता HSRP (High Security Registration Plate) बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या मोटार वाहन नियम १९८९ अंतर्गत हा निर्णय लागू करण्यात आला असून, वाहन सुरक्षेच्या दृष्टीने हा नियम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. यापूर्वी या प्रक्रियेसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र अनेक वाहनधारकांनी अद्याप क्ष्ठझ बसवले नसल्याचे निदर्शनास आल्याने आता ३० जून २०२६ ही अंतिम मुदत जाहीर करण्यात आली आहे.

**१ जुलैपासून थेट कारवाई !**

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, दि. ०१ जुलै २०२६ पासून HSRP प्लेट न बसविणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये दंड, वाहन जप्ती किंवा इतर कायदेशीर कारवाईचा समावेश असू शकतो.

**कोणत्या वाहनांना नियम लागू ?**

०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेली सर्व जुनी वाहने, दुचाकी, चारचाकी, खासगी व व्यावसायिक वाहने, परिवहन व अप परिवहन सर्व प्रकारची वाहने, HSRP नसल्यास अडकणार अनेक कामे, RTO प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, HSRP शिवाय खालील वाहनसंबंधित कामे होणार नाहीत :

वाहन हस्तांतरण,RC मधील पत्ता बदल नोंदणी नूतनीकरण, फिटनेस प्रमाणपत्र, डुप्लिकेट RC, बँक हायपोथिकेशन बदल, इतर सर्व वाहन व्यवहार,

**आता तरी जागे व्हा नाहीतर कारवाईला सामोरे जा !**

प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी वाहनधारकांना आवाहन केले आहे की, अंतिम मुदतीपूर्वी HSRP प्लेट बसवून घ्यावी व पुढील त्रास टाळावा.

सरकारच्या या आदेशामुळे आता वाहनधारकांमध्ये धावपळ सुरू झाली असून, ठढज कार्यालयात चौकशीसाठी गर्दी वाढत आहे.

# आळणी ग्रामस्थांचा संताप अनावर; अपूर्ण पाणीपुरवठा योजना तात्काळ पूर्ण करा

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)तालुक्यातील मौजे आळणी येथे अनेक दिवसांपासून रखडलेल्या पाणीपुरवठा योजनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून सांडपाणी व्यवस्थापन, नालेसफाई व नालेदुरुस्तीच्या कामांकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर आळणी ग्रामस्थांच्या स्वाक्षरीसह एक महत्त्वपूर्ण निवेदन जिल्हा परिषद धाराशिवच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियंवदा महाडदळकर यांना देण्यात आले. हे निवेदन अभयसिंह वीर, अशोक गाडे, विश्वजीत पाटील, युवराज कोळी, अजय गाडे, रियाज सय्यद आणि शुभम महामुनी यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

ग्रामस्थांनी निवेदनामध्ये स्पष्टपणे नमूद केले की, गावातील अपूर्ण पाणीपुरवठा योजना तात्काळ पूर्ण करण्यात यावी, अन्यथा नागरिकांना आगामी उन्हाळा आणि पावसाळ्यात गंभीर अडचणींना सामोरे जावे लागेल. याशिवाय गावातील साचलेले सांडपाणी, तुंबलेले नाले आणि खराब झालेली नालेव्यवस्था यामुळे डासांचे प्रमाण वाढून साथीचे आजार पसरण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियंवदा महाडदळकर यांनी ग्रामस्थांच्या मागण्यांची गंभीर दखल घेत पाणीपुरवठ्याचा विषय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मांडण्यात येईल, तसेच नालेसफाई व संबंधित कामे पावसाळ्यापूर्वी तातडीने करण्याबाबत आरोग्य विभागामार्फत सूचना देण्यात येतील, असे आश्वासन दिले.

ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, केवळ आश्वासन नको तर प्रत्यक्ष कामे सुरू झाली पाहिजेत. गावाच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही तर पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा संतप्त इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# निवडणूक काळात ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध सकाळी ६ ते रात्री १० पर्यंतच परवानगी

धाराशिव (जिमाका)विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रचारादरम्यान ध्वनीक्षेपकांच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये आदेश जारी केले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून,त्यानंतर आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाला प्राप्त अधिकारांचा वापर करून निवडणुकीच्या काळात लाऊडस्पीकरच्या वापरावर आयोगाने निर्बंध लागू केले आहेत.

सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सध्याच्या परिस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.त्यानुसार जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यांसाठी पुढील आदेश लागू केले आहेत.

आदेशानुसार कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंतच करता येणार आहे. त्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांची विधिवत परवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे. तसेच ध्वनीक्षेपकाचा वापर करताना वाहन सुरू स्थितीत ठेवून त्याचा वापर करता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व प्रकारच्या ध्वनीक्षेपकांचा वापर वाहनावर बसवून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंतच करण्यास परवानगी राहणार आहे.तसेच सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी,निवडणूक उमेदवार किंवा वाहनांवर ध्वनीक्षेपक वापरणाऱ्या व्यक्तींनी संबंधित परवानगीचे तपशील मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी आणि जवळच्या पोलीस ठाण्यास देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.हा बंदी आदेश १८ मे २०२६ पासून २५ जून २०२६ पर्यंत धाराशिव,लातूर आणि बीड जिल्ह्यांत लागू राहणार आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**
**9284321472**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**एस अँन्ड टी विभाग - गर्दी नियंत्रण व्यवस्थापन काम**

DRM (S&T) मध्य रेल्वे, सोलापूर, यांचे कार्यालय आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा सूचना क्र.:** SUR-N-T-2026-27-11, **दिनांक:-** १८.०५.२०२६. **कामाचे नाव व ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध स्थानकांवर गर्दी नियंत्रण व्यवस्थापनासाठी घोषणा प्रणालीसह प्रवासी माहिती फलक उपलब्ध करून देणे. **कामाचा अंदाजित खर्च:** २,१३,२५,७७६.३३. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **जमा करावयाची अनामत रक्कम:** ४,२६,५००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** १२.०६.२०२६, १५:३० वाजता. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष (चरपीरश्र), टपालाद्वारे, ई-मेलद्वारे, फॅक्सद्वारे किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग-३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक हमी या पर्यायांचा स्वीकार केला जाईल; तथापि, मूळ बँक हमीपत्र निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे, निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून) प्रत्यक्ष जाऊन जमा करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अँन्ड टि शाखा), मध्य रेल्वे, सोलापूर**
**AK/Sur-32**

**रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे.**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**दूरसंचार मालमत्तेची तरतूद**

DRM (ST) मध्य रेल्वे, सोलापूर यांचे कार्यालय आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा सूचना क्र.:** SUR-N-T-2026-27-12, **दिनांक:-** १८.०५.२०२६. **कामाचे नाव व ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागांतर्गत SSE / Tele / Kurudwadi यांच्या अखत्यारीतील वाहतूक सुविधा कामांसाठी दूरसंचार मालमत्तेची तरतूद करणे आणि त्यांचे स्थलांतर/पुनर्स्थापन करणे. **कामाचा अंदाजित खर्च:** ७८,९३,०२३.१२. **निविदा अर्जाची किंमत:** निरंक. **जमा करावयाची अनामत रक्कम:** १,५७,९००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** १९.०६.२०२६,रोजी १५:३० वाजता. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धिपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष, टपालाद्वारे, ई-मेलद्वारे, फॅक्सद्वारे किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग-३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक हमी या माध्यमांचा स्वीकार केला जाईल; तसेच, बँक हमीच्या मूळ प्रतीची निविदा सादर करण्याची अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष सुपूर्द करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (संकेत व दूरसंचार शाखा), मध्य रेल्वे, सोलापूर**
**AK/Sur-31**

**रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे.**


# निवडणूक काळात जिल्हाधिकारी कार्यालये,तहसील कार्यालये व विश्रामगृह परिसरात मिरवणुका,सभा,घोषणाबाजीस बंदी

धाराशिव (जिमाका)- विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया शांततेत,निर्भय आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी विविध निर्बंध लागू केले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या विधान परिषदेची स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक -२०२६ (उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघ) नुसार निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून,कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत,निर्भय आणि न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून सभा,मिरवणुका, निवडणूक प्रचार आदी बाबींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याची खात्री जिल्हादंडाधिकाऱ्यांना झाली आहे.

सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून आदेश जारी केले आहेत.

त्यानुसार निवडणुकीच्या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय,सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसील कार्यालये तसेच सर्व शासकीय विश्रामगृहे या ठिकाणी, नगरपरिषद हद्दीत पुढील बाबींना बंदी घालण्यात आली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची मिरवणूक किंवा मोर्चा काढणे,आंदोलन, निदर्शने किंवा उपोषण करणे, कोणत्याही प्रकारची घोषणाबाजी करणे, वाद्य वाजविणे किंवा गाणे म्हणणे तसेच कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे यांचा समावेश आहे.

हा आदेश १८ मे ते २५ जून २०२६ या कालावधीत धाराशिव,लातूर आणि बीड जिल्ह्यांत लागू राहणार आहे.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649